महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई • नवी मंबई • ठाणे • रायगड • पालघर

मुख्य संपादक : रवींद्र घोडविंदे | Rs.2/- | कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

बुधवार ■ 23 एप्रिल 2025 ■ वर्ष 6 ■ अंक 294 ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024





## खर्डी येथे 'बाप' विषयावर कवी संमेलन

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**शहापूर (वार्ताहर):** आदर्श शिक्षण कला क्रीडा सामाजिक सेवा संस्था आणि आसरा बहुउद्देशीय सामाजिक संस्थेच्या वतीने शहापूर तालुक्यातील खर्डी येथे 'बाप' या विषयावर रविवारी (ता.२०) कवी संमेलन झाले. या संमेलनात विविध ठिकाणाहून आलेल्या कवींनी सहभाग नोंदवून भावनिक कविता सादर केल्या. यावेळी वडिलांना जीवनात कोणत्या हाल, अपेष्टा, संघर्ष करावा लागतो. याबाबत उपस्थित मान्यवरांनी मते व्यक्त केली. यावेळी सुभाष शिंदे यांना प्रथम क्रमांक, जयराम पारधी यांना द्वितीय तर शीतल शिंदे यांच्या कवितेला तिसऱ्या क्रमांकाचे पारितोषिक मिळाले. या कवींना सन्मानचिन्ह आणि प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. यावेळी अशोक वीर, दिलीप अधिकारी, प्रकाश पतंगराव, फारुक मेमन, दर्शना पतंगराव, जयवंत पतंगराव उपस्थित होते.

## भिवंडी पालिका आयुक्तांचा मान्सून पूर्व पाहणी दौरा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी :** भिवंडी शहरात विविध ठिकाणी विकास कामे सुरु असुन, या सुरु असलेल्या विकास कामांची आज दि.२१/०४/२०२५ रोजी मा. प्रशास तथा आयुक्त श्री. अनमोल सागर यांनी पाहणी केली.विशेष म्हणजे भिवंडी एम.एम.आर.डी.ए., पी.डब्ल्यु.डी यांच्या मार्फ़त तिनबत्ती, मंडई, हिन्दूस्तानी मंस्जीद, ठाणा रोड, धामणकर नाका रोड व इतर ठिकाणी सुरु असलेल्या सि.सि. रस्त्यांची मा. प्रशासक तथा आयुक्त यांनी पाहणी केली तसेच जी अतिक्रमणे या पूर्वी तोडली आहेत त्यांची सुध्दा पाहणी केली. तसेच शहरात विविध ठिकाणी ड्रेनेजचे काम सुरु आहे त्याची सुध्दा पाहणी केली. या सर्वांची पाहणी केली असता सर्व ठेकेदार व अधीकारी वर्ग यांना ही सर्व कामे पावसाळ्यापूर्वी पूर्ण करण्याच्या सुचना दिल्याया प्रसगी शहर अभियंता श्री. जमिल पटेल, अति. शहर अभियंता श्री. सचिन नाईक, प्रभाग अधिकारी व इतर अधिकारी वर्ग उपस्थित होते.

# हिंदी भाषेची सक्ती मागे

## शिक्षणमंत्री दादा भुसे यांचे सूतोवाच



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई :** इयत्ता पहिलीपासून शाळेत हिंदी अनिवार्य करण्यासंदर्भाने घेतलेल्या निर्णयावर राज्य सरकारने एक पाऊल मागे घेतले आहे. राज्य सरकारच्या शासन निर्णयात हिंदी भाषा "अनिवार्य" असा शब्दप्रयोग करण्यात आला होता, त्यामुळे प्रश्न उद्भवले. मात्र, आता अनिवार्य या शब्दाला स्थगिती देत आहोत आणि पुढील शासन निर्णय यथावकाश निर्मगीत केलं जाईल, अशी माहिती देखील दादा भुसे यांनी दिली. त्यामुळे, बोर्डाच्या त्रैभाषिक सुत्रानुसार, मराठी, इंग्रजी आणि आता हिंदी (Hindi) भाषा ऐच्छिक असणार आहे, असेही दादा भुसे यांनी स्पष्ट केले. मनसे आणि विरोधी पक्षाच्या प्रखर विरोधानंतर राज्य सरकारने एक पाऊल मागे घेतल्यानंतर मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी या निर्णयाचे स्वागत करत सरकारचे आभार मानले.

सरकारने अनिवार्य शब्द हटविण्याच्या निर्णय घेतल्यानंतर राज ठाकरे यांनी यावर प्रतिक्रिया दिली. "सरकारने आधीच विचार करुन निर्णय घेतला असता तर आज माघार घेण्याची वेळ आली नसती. पण, सरकारने हा निर्णय मागे घेतला यासाठी सरकारचे धन्यवाद," अशी प्रतिक्रिया मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी दिली. तसेच, महाराष्ट्रात दुसरी-तिसरी कोणती भाषा चालणार नाही. महाराष्ट्रात फक्त मराठी चालणार, असेही राज ठाकरे यांनी म्हटलं. दरम्यान, राज्य शालेय अभ्यासक्रम आराखडा २०२४ नुसार महाराष्ट्रात पहिलीपासूनच हिंदी ही भाषा अनिवार्य करण्यात आली आहे. मी स्वच्छ शब्दांत सांगतो की ही सक्ती महाराष्ट्र नवनिर्माण सेना खपवून घेणार नाही, असा इशारा राज ठाकरेंनी दिला होता.

पत्रकार परिषदेत मंत्री दादा भुसे म्हणाले की, मी स्पष्टपणे नमूद करतो की, हिंदी भाषेच्या संदर्भात केंद्राकडून थोपवलं जाताय हे सांगितलं जाताय असा कुठलाही भाग नाही. नेशनल एड्युकेशन पॉलिसी 2020 मध्ये स्पष्टपणे भाषेच्या संदर्भातला पॅराग्राफ आहे. तीन भाषा शिकवण्यासंदर्भात, तीन भाषेचा हा फॉर्म्युला तिथ दिलेला आहे. केंद्राने कोणतीही भाषा राज्यासाठी बंधनकारक केलेली नाही. 2020 चे शैक्षणिक धोरण आहे. त्यानुसार, 9 सप्टेंबर 2024 ला तीन भाषेपैकी 2 भाषा आपल्या देशाच्या संबंधित असल्या पाहिजे, असं सांगण्यात आलंय. राज्य सुकाणू समितीच्या बैठकीत तिसरी भाषा हिंदी म्हणून स्वीकारण्याचा निर्णय झाल्याचे दादा भुसे यांनी स्पष्ट केले.

लवकरच नवी शासन निर्णय निर्गमित करू

16 एप्रिल रोजीचा जो शासन निर्णय जारी झाला त्यात मराठी भाषा विषय तसाच राहणार असून त्याला प्राधान्य आहेच.इंग्रजी दुसरा विषय आणि तिसरा विषय हिंदी भाषा हे स्वीकारलं आहे. शासन निर्णय मध्ये हिंदी भाषा अनिवार्य असेल असं शब्द वापरला गेला त्यामुळे प्रश्न निर्माण झाला आहे. हिंदी सोडून जर दुसरी भाषा शिकायचं ठरलं तर शिक्षक सुद्धा त्याच भाषेचे लागतील, त्यासाठी धोरण ठरवावं लागेल. त्यामुळे, आताच्या घडीला हिंदी विषय ऐच्छिक ठेवणार आहोत, इतर विषयासंदर्भात आपण निर्णय घेऊ, असे शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी स्पष्ट केले. तर, जे हिंदी साठी ऐच्छिक असतील त्यांना मराठी इंग्रजी सोबत हिंदी विषय शिकवला जाईल.. इतर भाषा संदर्भात ऐच्छिक असतील त्यावर संदर्भात निर्णय घेऊ, असेही त्यांनी सांगितले.

बोर्डाने त्रैभाषिक सुत्र स्वीकारलं

जेंव्हा भविष्यात बोर्ड वाईज कम्पॅरीजन होणार आहे, पॉईंटस दिले जाणार आहेत. त्यामध्ये तिसरी भाषा विषयाचे गुण दिले जाणार आहे. त्री भाषिक सूत्र इतर बोर्डाने स्विकरलं आहे. आपले विद्यार्थी स्पर्धेत टिकले पाहिजे यासाठीच शासनाने हा निर्णय घेतला आहे. कोणाला कमी लेखणे हा विषय नाही, असे स्पष्टीकरण दादा भुसे यांनी पत्रकार परिषदेतून दिले आहे.

# अंजुरफाटा मेट्रोचा महत्वाचा टप्पा यशस्वी

## अभियांत्रिकी मॉडेल असलेले 65 मीटर गर्डर लॉंच

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी :** मुंबई मेट्रोची पाचवी लाईन ठाणे ते भिवंडीमार्गे कल्याणपर्यंत जाणार असून सध्या भिवंडी धामणकर नाका ते कापूरबावडी हा टप्पा प्रगती पथावर आहे. मागील काही दिवसांपासून या मार्गावरील अंजूरफाटा येथील रेल्वे ट्रॅकवर गर्डर टाकण्याचे जटील काम सुरु असून हे काम येत्या ३० एप्रिलपर्यंत पूर्ण होणार असल्याची माहिती मिळते.



भिवंडीकरांना गेल्या काही वर्षांपासून ठाणे आणि कल्याण येथे जाऊन रेल्वे गाठणे अत्यंत कठीण झाले असून भारतीय रेल्वेचे शहरातील भिवंडी रोड हे स्थानक देखील स्थानिक प्रवाशांना पूर्णवेळ रेल्वे सेवा देण्यास अपयशी ठरले आहे. त्यातच होऊ घातलेली एमएमआरडीएची मेट्रो-५ ही प्रवासी सेवा भिवंडीकरांच्या प्रवासाचा आणि प्रगतीचा एक महामार्ग ठरणार आहे. मुंबईच्या जवळ असणाऱ्या भिवंडी शहराकडे हळूहळू मुंबई-ठाण्यातील नागरिकांचा ओघ वाढू लागल्याने प्रवासी समस्या दिवसेंदिवस वाढत आहे. तसेच व्यापारी बाजारपेठ आणि व्यावसायिक सुविधा वाढत असल्याने मुंबई, ठाणे आणि नवी मुंबईत जाणारे वाहतुकीचे मार्ग भिवंडीतून जात असल्याने या शहरावर वाहतुकीचा मोठा ताण येत आहे.

मेट्रो ५ ठाणे-भिवंडी-कल्याण या मार्गावर भिवंडीतील कल्याणरोड येथे झालेल्या नागरिकांच्या विरोधामुळे मागील काही वर्षांपासून मेट्रोचे काम संथगतीने सुरु होते. मात्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मागील महिन्यात भिवंडी-कल्याण मार्गावर भुयारी मार्गाला मंजुरी देत आर्थिक तरतूद केल्याने मेट्रो-५ च्या कामाने पुन्हा वेग धरला आहे. त्याच अनुषंगाने मागील काही दिवसांपासून अंजूरफाटा येथील या मुख्य वाहनांच्या वर्दळीच्या ठिकाणी आणि त्यामुळे होणाऱ्या वाहतूक कोंडीच्या दोन चौकाच्या ठिकाणी रेल्वे प्रशासन आणि वाहतूक पोलिसांच्या सहकार्याने मोठे ऐतिहासिक कामगिरी पार पडली. त्यासाठी या मार्गावर अहोरात्र चालणारी वाहतूक चार दिवस रात्रीच्या वेळी बंद करण्यात आली. आणि अंजूरफाटा येथे रेल्वे ट्रॅक आणि महामार्ग यांच्या दोन बाजूला उभे असलेल्या उंच खांबावर तयार केलेले अभियांत्रिकी मॉडेल असलेले ६५ मीटर गर्डर लॉंच केले गेले.

### प्रलंबित कामांची यादी पाठवत

## राजू पाटील यांचे एकनाथ शिंदे यांना आव्हान

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण –** साताऱ्यात दरे गावी विश्रांतीसाठी गेलेल्या उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना स्थानिक पत्रकारांनी मुंबईत राज-उध्दव एकत्र येत आहेत, असा प्रश्न करून त्यांची प्रतिक्रिया जाणून घेण्याचा प्रयत्न केला. या प्रश्नावर चिडून 'काही तरी कामाचे बोला रे' असे बोलून एकनाथ शिंदे यांनी राग व्यक्त करून या प्रश्नाच्या उत्तराला बगल दिली होती. 'कामाचे बाला रे' असा शब्दप्रयोग एकनाथ शिंदे यांनी केल्याने मनसेचे कल्याण ग्रामीणचे माजी आमदार राजू पाटील यांनी कामाचे बोलताय ना, तर मग ही घ्या विकास कामांची यादी. ही कामे कधी मार्गी लागणार, असा प्रश्न करून ती कामे कधी मार्गी लागतील ते सांगा असे उघड आव्हान दिले आहे.

कल्याण ग्रामीण, कल्याण डोंबिवलीतील नागरी समस्यांच्या विषयावर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि खासदार डॉक्टर श्रीकांत शिंदे यांना डिवचण्याची एकही संधी न सोडणाऱ्या माजी आमदार राजू पाटील यांनी गेल्याच आठवड्यात शिंदे यांना डिवचले होते.

# दहागाव प्राथमिक आरोग्य केंद्राला जमीन मिळेल का हो ?

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** सुमारे३२किलोमीटरचा प्रदिर्घ परिसर, अंदाजे१लाखांच्या आसपास लोकसंख्या,९उपकेंद्र, यातीलही काहींना इमारतच नाही, अनेक रिक्त पदे, अपुरे कर्मचारी अशाही परिस्थितीत इंडियन पब्लिक हेल्थ सँडर च्या नियमांत बसत नसताना देखील दहागाव प्राथमिक आरोग्य केंद्र उत्तोमोत्तम आरोग्य सेवा देत आहे, परंतु या परिसरात जागा उपलब्ध असताना, अनेक प्रस्ताव पाठविले असताना ही पीएचसी, प्रशस्त, सुसज्ज, जागेत का होत नाही, तर यासाठी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी आणि जिल्हाधिकारी यांनी लक्ष घातले तर मात्र भविष्यात चित्र वेगळे पहायला मिळेल, अशा खात्री वाटते.



कल्याण तालुक्यातील दहागाव प्राथमिक आरोग्य केंद्रातर्गत९ उपकेंद्रे आहेत, यामध्ये कांबा, दहागाव, भिसोळ, मानिवली, दहिवली, गोवेली, कुंदा, जांभूळ आणि शिरढोण, यातील अनेक उपकेंद्रांना इमारत नाही, तर हा संपूर्ण परिसर सुमारे३२किलोमीटर इतका प्रदिर्घ आहे,६आरोग्य सेवक,२आरोग्य सहाय्यक,८शिस्टर, तर३रिक्त,म्हारळ, वरप, कांबा सारखी झपाट्याने शहरीकरण होणारी गावे, सुमारे९७हजार ते १लाखापर्यंत लोकसंख्या, आणि या लोकांसाठी दिड ते दोन गुट्यांत असणारे दहागाव हे उपकेंद्र? कसा ताळमेळ बसणार? अशातच विविध साथीचे आजार, तोंडावर पावसाळा, यातून उद्भवतणारी परिस्थिती? यामुळे याठिकाणी सुसज्ज प्राथमिक आरोग्य केंद्र व्हावे अशी ग्रामस्थांनसह नागरिकांची इच्छा आहे,सुदैवाने बांधण्याचापाडा व दहागाव ग्रामपंचायत कार्यालय येथे जागा देखील उपलब्ध असताना घोडे अडले कुठे? ११मार्च रोजी कल्याण तहसीलदार सचिन शेजाळ यांनी या परिसराची पाहणी केली, व या मोकळ्या जागेचा प्रस्ताव पाठविण्याच्या सूचना ग्रामसेकांना दिल्या त्यानुसार ग्रामसेवक श्री कुटेमाटे यांनी प्रस्ताव पाठविला, येथे सुमारे२२एकर पर्यंत जागा आहे. पण येथे किरकोळ काही अडचणी आहेत, ही जागा उपलब्ध होत नसेल तर मांजर्ली तर्फे बा-हे येथे स नं२३मध्ये तब्बल९-५१हेक्टर आर ऐवढे गुरचरन क्षेत्र असून त्यापैकी१:२०हेक्टर आर क्षेत्र प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी देण्याची मागणी, प्रस्ताव, तहसीलदार, तत्कालीन प्रांताधिकारी अभिजित भांडे पाटील यांनी जिल्हाधिकारी यांना२०२१मध्ये पाठवला होता.तशा सूचना आमदार किसन कथोरे यांनी दिल्या होत्या, परंतु आजतागायत हे घोडं गंगेत न्हाहल नाही.

आता जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे हे धडाकेबाज निर्णयामुळे प्रसिद्ध आहेत, त्यांचे जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांच्याशी चांगले बाँडिंग आहे, त्यामुळे या बाबतीत त्यांनी पुढाकार घेतला व जिल्हाधिकां-यानी इच्छाशक्ती दाखवली तर नक्कीच या परिसरात सुसज्ज, प्रदिर्घ जागेत प्राथमिक आरोग्य केंद्र निर्माण होऊ शकते, व तशी येथील ग्रामस्थ व नागरिकांची देखील मागणी आहे.






### ठाणे जिल्हा परिषदेच्या

## शिक्षकांना हक्काच्या वेतनासाठी प्रतीक्षा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता
प्रतिनिधी

**मुरबाड, ता. २२ (वार्ताहर)** जिल्हा परिषदेतील प्राथमिक शिक्षकांना वेळेवर वेतन मिळणे, ही कागदावरची बाब आहे. शिक्षण विभागाला निधी प्राप्त होऊनही ठाणे जिल्ह्यातील ग्रामीण भागातील शिक्षकांना हक्काच्या वेतनासाठी प्रतीक्षा करावी लागत आहे. अशातच एप्रिलचे २१ दिवस लोटले तरी मार्चचा पगार खात्यात जमा झालेला नसल्याने शिक्षकांवर उपासमारीची वेळ आली आहे.



> **शासनाकडून निधी वेळेवर मिळूनही शिक्षकांना वेतनासाठी प्रत्येक वेळी वाट पाहावी लागणे, हे प्रशासनाच्या नाकर्तेपणाचे उदाहरण आहे. शिक्षकांच्या आर्थिक अडचणी आणि त्यांच्या कुटुंबाच्या गरजा प्रशासनाने गांभीर्याने घेण्याची गरज आहे.**
>
> ● कृष्णाकांत मलिक, प्राथमिक जिल्हाध्यक्ष, महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद, ठाणे

ई-कुबेर प्रणालीतील तांत्रिक अडचणी आणि सदोष देयकांमुळे वेतन प्रक्रियेला विलंब होत असल्याचे नेहमीचेच कारण प्रशासनाकडून दिले जात आहे. मुख्याध्यापकांनी तयार केलेली वेतन देयके गट शिक्षणाधिकाऱ्यांमार्फत जिल्हा परिषदेकडे पाठवली जातात. त्यानंतर जिल्हा परिषदेकडून कोषागार कार्यालयात बी.डी.एस. (बँक डेटा स्ट्रक्चर) जनरेट करण्याची प्रक्रिया पार पडते; मात्र शाळांनी पाठवलेल्या देयकांमध्ये त्रुटी आढळल्याने पगार वाटपात अडचणी येतात. वेतन देयके बनवण्याची एक सुव्यवस्थित प्रक्रिया असली तरी, प्रशासकीय स्तरावर पालन कधीच होताना दिसत नाही. मुख्याध्यापकांनी आवश्यक कपात करून देयके गटशिक्षणाधिकाऱ्यांकडे पाठवणे, गटशिक्षणाधिकाऱ्यांनी त्यांची तपासणी करून जिल्हा परिषदेकडे पाठवणे अपेक्षित आहे; परंतु या प्रक्रियेत नेहमीच काहीतरी त्रुटींमुळे ग्रामीण भागातील शिक्षकांना फटका बसत आहे.

# पोलीस ठाण्यात खोटे गुन्हे होतात दाखल ?

## खासदार बाळ्या मामांची पोलिसांवर आगपाखड

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी:** भिवंडी ग्रामीण भागातील तालुका पोलीस ठाण्यात खऱ्या गुन्ह्यांऐवजी खोटे गुन्हे दाखल करण्यात येत असून खऱ्या गुन्ह्यांमध्ये टाळाटाळ होत असल्याचा आरोप भिवंडी लोकसभा मतदारसंघाचे खासदार सुरेश म्हात्रे उर्फ बाळ्या मामा यांनी केला आहे.सोमवारी खासदार बाळ्या मामा यांनी तालुका पोलीस ठाण्यात धाव घेत तालुका पोलिसांना चांगलेच धारेवर धरून खडसावले.

तालुका पोलीस ठाण्याच्या हद्दीत असलेल्या खार्डी गावातील एका तरुणाला मारहाण झाल्यानंतर सदर तरुण मारेकऱ्यांच्या भीतीने तक्रार दाखल करण्यासाठी तालुका पोलीस ठाण्यात सोमवारी गेला होता.मात्र या मारहाण झालेल्या तरुणाला तालुका पोलिसांनी तीन तासाहून अधिक काळ गुन्हा नोंद न करता ताटकळत ठेवले होते. या संपूर्ण प्रकरणाची माहिती खासदार बाळ्या मामा यांना मिळताच खासदार बाळ्या मामा यांनी तालुका पोलीस ठाण्यात धाव घेत तालुका पोलीसांना चांगलेच धारेवर धरले.

तालुका पोलिसांनी मागील अनेक खऱ्या प्रकरणांमध्ये फिर्यादीची बाजू ऐकून न घेता गुन्हा दाखल करण्यास देखील विलंब करत असून काही दाखल गुन्ह्यांमध्ये तालुका पोलीस फिर्यादी ऐवजी आरोपींची बाजू उचलून धरत असल्याने अनेक प्रकरणांमध्ये फिर्यादींनी आरोपींना घाबरून स्वतःच्या व कुटुंबियांच्या सुरक्षेच्या दृष्टीने आपले दाखल गुन्हे मागे घेतल्याची अनेक प्रकरणे आपल्या समोर आली आहेत.वेळ आल्यास हि प्रकरणे पुराव्यांनिशी आपण समोर आणू शकतो असा दावा देखील खासदार बाळ्या मामा यांनी यावेळी केला आहे.

कोणत्या राजकीय दबावापोटी तालुका पोलीस खोटे गुन्हे त्वरित दाखल करतात.मात्र खऱ्या गुन्ह्यांमध्ये नागरिकांना वेठीस धरून त्यांच्याकडून पुराव्यांची मागणी करत फिर्यादींना ताटकळत ठेवतात.तालुका पोलिसांची हि कृती दुर्दैवी असून यामुळे तालुक्यात कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणार असुन तालुका पोलोसांनी वेळीच या बाबीची गंभीर दखल घेतली नाही तर आपण तालुका पोलीस ठाण्यात धरणे आंदोलन करू असा इशारा यावेळी खासदार बाळ्या मामा यांनी दिला आहे.

# गीतासार



## अध्याय ८
## अक्षरब्रह्मयोगः

शुक्लकृष्णे गती ह्येते जगतः शाश्वते मते । एकया यात्यनावृत्तिमन्ययावर्तते पुनः ॥ ८-२६ ॥

कारण जगाचे हे दोन प्रकारचे शुक्ल व कृष्ण अर्थात देवयान व पितृयान मार्ग सनातन मानले गेले आहेत. यांतील ज्या मार्गाने गेले असता परत यावे लागत नाही, अशा मार्गाने गेलेला त्या परम गतीला प्राप्त होतो आणि दुसऱ्या मार्गाने गेलेला पुन्हा परत येतो म्हणजे जन्म-मृत्यूला प्राप्त होतो. ॥ ८-२६ ॥

नैते सृती पार्थ जानन्योगी मुह्यति कश्चन । तस्मात्सर्वेषु कालेषु योगयुक्तो भवार्जुन ॥ ८-२७ ॥

हे पार्था (अर्थात पृथापुत्र अर्जुना), अशा रीतीने या दोन मार्गांना तत्त्वतः जाणल्यावर कोणीही योगी मोह पावत नाही. म्हणून हे अर्जुना, तू सर्व काळी समबुद्धिरूप योगाने युक्त हो अर्थात नेहमी माझ्या प्राप्तीसाठी साधन करणारा हो. ॥ ८-२७ ॥


वेदेषु यज्ञेषु तपःसु चैव दानेषु यत्पुण्यफलं प्रदिष्टम् । अत्येति तत्सर्वमिदं विदित्वा योगी परं स्थानमुपैति चाद्यम् ॥ ८-२८ ॥

योगी पुरुष या रहस्याला तत्त्वतः जाणून, वेदांचे पठण, यज्ञ, तप, दान इत्यादी करण्याचे जे पुण्यफळ सांगितले आहे, त्या सर्वाला निःसंशय ओलांडून जातो आणि सनातन परमपदाला पोहोचतो. ॥ ८-२८ ॥

ॐ तत्सदिति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे अक्षरब्रह्मयोगो नामाष्टमोऽध्यायः ॥८॥

ॐ हे परमसत्य आहे. याप्रमाणे श्रीमद्‌भगवद्‌गीतारूपी उपनिषद तथा ब्रह्मविद्या आणि योगशास्त्राविषयी श्रीकृष्ण आणि अर्जुन यांच्या संवादातील अक्षरब्रह्मयोगः नावाचा हा आठवा अध्याय समाप्त झाला. ॥ ८ ॥

# चला वाचू आनंदे



'न हि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते'

ज्ञानासारखी अन्य कोणतीही पवित्र वस्तू या साऱ्या विश्वात नाही. हे ज्ञान मिळविण्याचे सर्वोत्तम साधन म्हणजे पुस्तक होय!

दरवर्षी २३ एप्रिल रोजी जागतिक पुस्तक आणि कॉपीराइट दिन साजरा केला जातो. युनेस्को आणि त्यासंबंधित संस्था लोकांमध्ये वाचनाची सवय वाढवणे आणि जगभरातील लेखक आणि पुस्तकांचा सन्मान करणे या हेतूने जगभरात जागतिक पुस्तक दिन साजरा करतात.आपल्याला कल्पना आहे की, मानवी जीवनात पुस्तकांचे अनन्यसाधारण महत्त्व आहे.

पुस्तकांमुळेच आपले व्यक्तिमत्त्व बहुआयामी, बहुढंगी होते. याचाच अर्थ, ही पुस्तके वाचूनच आपली ज्ञानवृद्धी होते. आपली चित्तशुद्धी होते. आपली बुद्धी तीक्ष्ण, तल्लख व कुशाग्र होते. आपणांस बहुश्रुतता प्राप्त होते. आपल्या मनाचे रंजन होत असते. वाचन आणि पुस्तके यांत अगदी निकटचा संबंध आहे. त्याकरिता 'मानवी जीवनात वाचनाचे व पुस्तकांचे महत्त्व' या विषयावर अधिक भाष्य करणारा 'चला, वाचू आनंदे'... हा लेख चोखंदळ वाचकांसमोर सादर करतांना मला मनस्वी आनंद होत आहे...

मनुजा वाचनेनैव बोधन्ते विषयान बहून
दक्षा भवन्ति कार्येषु वाचनेन बहुश्रुताः

याचा अर्थ आहे की, 'वाचनामुळे आपल्याला अनेक विषयांचे आकलन होते. वाचन केल्यानेच आपण आपल्या कार्यात दक्ष होतो, आपणांस बहुश्रुतता प्राप्त होते.'

शालेय जीवनात एक शिक्षक व एक विद्यार्थी म्हणून वाचनाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. तसेच समाजातील सर्व घटकांनी वाचन करणे महत्वाचे आहे. वाचन म्हणजे एखाद्या लिखित अथवा मुद्रित मजकुराचा अर्थ लावणे व समजून घेणे. वाचन म्हणजे केवळ अक्षरांची ओळख नसून एखाद्या मजकुरातील आशय समजून घेणे, एखादी गोष्ट आकलन करून घेणे, विचार करून त्याद्वारे उचित असे निष्कर्ष काढणे होय.

वाचनाचे मूकवाचन व प्रकटवाचन किंवा मुखवाचन असे प्रमुख दोन प्रकार पडतात.

१. मूकवाचन (Silent Reading)

हे वाचन मनात केले जाते. आवाज न करता, डोळ्यांनीच शब्दांचा मागोवा घेत वाचन केले जाते. हे वाचन जलद आणि अधिक परिणामकारक असते.

२. प्रकटवाचन किंवा मुखवाचन (Loud Reading)

हे वाचन मोठ्याने, आवाज करून केले जाते. शिक्षक, विद्यार्थी किंवा वक्ते याचा उपयोग करतात. यात उच्चार, स्वर आणि शब्दोच्चार यावर भर असतो.

गोष्ट व कथा, कादंबरी, व्यक्तीचरित्र, नाटक, कविता, प्रवासवर्णन, प्रसंगवर्णन, आत्मचरित्र, निबंध, ललितलेखन, वर्तमानपत्र नियतकालिके व दिवाळी अंक अशा विविध रूपांतील साहित्य व आपल्या शालेय अभ्यासक्रमाची विविध प्रकारची पाठ्यपुस्तके आणि इतर पुस्तके व ग्रंथ आपण वाचत असतो. वाचनाच्या माध्यमातून आपल्याला विविध विषयांचे ज्ञान मिळते, विविध गोष्टींची माहिती समजते, अनेक क्षेत्रातील विविध प्रकारच्या व्यक्ती ते समष्टीचे अनुभव मिळतात. तसेच आपले मनोरंजनही होते. वाचनामुळे आपल्याला निखळ आनंद मिळत असतो. आपल्या मनातील ताण-तणाव दूर होतात. विविध साहित्यकृती वाचून आपल्या मनाला शांती प्राप्त होऊन आपल्या चित्तवृत्ती स्थिर व शांत होत असतात.

वाचन आणि पुस्तके व ग्रंथ यांचा निकटचा संबंध असल्याने मानवी जीवनात वाचन व पुस्तके यांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. साने गुरुजींचे 'पुस्तकांमध्ये माणसाचं खरं आयुष्य लपलेलं असतं.' हे विधान आपल्याला अधिक अंतर्मुख करते.

पुस्तकांमध्ये उत्कृष्ट लेखकांचे, प्रतिभावंत साहित्यिकांचे जीवन अनुभव आणि प्रगल्भ व सारासार विचार असतात. त्यांची पुस्तके वाचून आपण त्यांचे उच्च विचार जाणून घेऊ शकतो. आपण स्थळ-काळाच्या भिंती ओलांडून लेखकांच्या जीवनानुभवांची प्रत्यक्ष अनुभूती घेऊ शकतो. ज्यातून आपण स्वतः ज्ञानसंपन्न व गुणसंपन्न होऊन बहुश्रुत होतो. आपल्यात हजरजबाबीपणा येतो.

सुप्रसिद्ध इंग्रजी लेखक फ्रान्सिस बेकन यांनी म्हटले आहे की, "वाचनाने परिपूर्ण माणूस घडतो. एक चांगला वाचक एक चांगले व्यक्तिमत्त्व विकसित करतो."

पुस्तकांमध्ये ज्ञानाचे अंकुर असतात. चांगली पुस्तके चांगला नैतिक सल्ला देतात. चांगली पुस्तके वाचून आपण सद्गुणांवर प्रेम करायला शिकतो. परंतु पुस्तके वाचतांना काही मर्यादा आहेत. अथांग ज्ञानरुपी सागरातून ज्ञानामृत मिळवायचे असेल तर काही गोष्टी आपण निश्चितच लक्षात घेऊन व वेळेचे नियोजन करून शालेय जीवनात जास्तीत जास्त उत्तम पुस्तकांचे वाचन केले पाहिजे.

एक विद्यार्थी किंवा एक शिक्षक म्हणून मी कोणत्या प्रकारचे वाचन करावे? समाजाचा एक जाणकार घटक म्हणून मला कशाचे वाचन करणे हितावह आहे? हे लक्षात घेऊन आपण विविध प्रकारचे वाचन केले पाहिजे.

शीलं सद्गुणसम्पत्तिः ज्ञानं विज्ञानमेव च
उत्साहो वर्धते येन वाचनं तद हितावहम

मला असे वाचन करणे हितावह आहे की, ज्यामुळे आपले शील वा चारित्र्य व सद्गुणरुपी संपत्ती यांची वृद्धी होते, आपले ज्ञान व विज्ञान तसेच आपल्यातील उत्साह वाढतो.हे लक्षात घेऊनच आपण प्रत्यकाने आपल्या आवडीनुसार व सवडीनुसार आवश्यक त्या पुस्तकांचे वाचन केले पाहिजे. एक विद्यार्थी म्हणून मी रामायण-महाभारतातील गोष्टी, हितोपदेश, पंचतंत्र आदी गोष्टींचे वाचन केले पाहिजे. विद्यार्थ्यांनी आपल्या शालेय अभ्यासक्रमाची विविध प्रकारची पाठ्यपुस्तके मनःपूर्वक वाचून समजून घेतली पाहिजेत. संस्कार कथा, शौर्य कथा, मूल्यवर्धनात्मक कथा आदी कथांचे वाचन केले पाहिजे. तर एक शिक्षक व देशाचा सुजाण व कर्तव्यदक्ष नागरिक म्हणून आपण सर्वांनी मन व शरीर यांचे स्वास्थ्य जपणाऱ्या गोष्टींचे ज्ञान आपण विविध पुस्तके वाचून मिळविले पाहिजे. तसेच आपल्या भारत देशाचा प्राचीन ते आजतागायतचा देदीप्यमान इतिहास आपण वाचून समजून घेतला पाहिजे. आपण आपल्या भारतीय ज्ञान प्रणालीचा इतिहास व परंपरा समजून घेतली पाहिजे. वाचनाद्वारे आपण आपले विज्ञान, नीतिशास्त्र खगोलशास्त्र, संगीत जाणून घेतले पाहिजे. वेद, शास्त्र, पुराणे, उपनिषदे, भगवद्गीता, रामायण, महाभारत; संत-पंत-तंत साहित्य; आदी धार्मिक व आध्यात्मिक वाङ्मय तसेच गोष्ट व कथा, कादंबरी, काव्य, व्यक्तीचरित्र, नाटक, प्रवासवर्णन, प्रसंगवर्णन, आत्मचरित्र, निबंध, ललितलेखन, वर्तमानपत्र नियतकालिके व दिवाळी अंक अशा विविध रूपांतील साहित्य आणि इतर पुस्तके व ग्रंथ आपण वाचलेच पाहिजेत. हे व इतर सर्व साहित्य माहिती आणि ज्ञानाचा समृद्ध स्रोत असल्याने त्यातील दिलेले ज्ञान व माहिती समजून घेऊन त्याचा आपल्या दैनंदिन जीवनामध्ये वापर केला पाहिजे. आज माहिती व तंत्रज्ञानाच्या प्रगत युगात इंटरनेटवरही डिजिटल स्वरूपात हा ज्ञानाचा खजिना उपलब्ध आहे. इंटरनेटवरील ज्ञानाचा खजिना आपण आपल्या उपयुक्ततेनुसार व वेळेनुसार वाचला पाहिजे, त्यातील ज्ञान समजून घेतले पाहिजे.

चांगल्या पुस्तकांच्या वाचनानेच आपल्यावर उत्तम संस्कार व सवयींचे बीजारोपण होत असते. उत्तम व चांगली पुस्तके वाचनाने आपला नाव लौकिक होत असतो. वाचनाने आपले चारित्र्य प्रगत, उन्नत होत असते. आपल्यात सर्जनशीलता, संवेदनशीलता, सद्भावना आदी मूल्य विकसित होतात. आपली मानसिक कार्यक्षमता वाढते. पुस्तके निर्मळ व निखळ आनंदाची प्राप्ती करून देणारे झरे असतात. उत्तम पुस्तकांच्या वाचनाने आपले मन ताजेतवाने, तरुण, निकोप व निरोगी होत असते. सुंदर पुस्तकांच्या वाचनाने आपल्यातील ताण-तणाव नाहीसे होतात. मनाचे स्वास्थ्य उत्तम राहते. वाचन आपल्याला जीवनाबद्दल नवीन दृष्टीकोन प्रदान करते. चांगली पुस्तके आपल्यावर सकारात्मक प्रभाव टाकू शकतात आणि आपल्या आयुष्याला ती योग्य दिशेने नेतात. पुस्तकांमुळेच आपल्यात सकारात्मक दृष्टिकोन निर्माण होतो.

वाचनामुळे भाषेची कौशल्ये आणि शब्दसंग्रह विकसित होऊन आपल्याला भाषिक व वैचारिक प्रगल्भता प्राप्त होते. नवनिर्मितीची क्षमता विकसित होऊन नवीन लेखन करण्याची ताकद आपल्यात निर्माण होत असते. आपले संप्रेषण कौशल्य विकसित होते. वाचनानेच आपली एकाग्रता शक्ती विकसित होत असते. आपल्या मनाचे रंजन होत असते. पुस्तकांमुळेच आपले व्यक्तिमत्त्व बहुआयामी, बहुढंगी होते. आपण अष्टपैलू होतो.

**लेखक : शारदासुत सुनील मारुती म्हसकर**
**संपर्क :- ९०२९३०२१११ /९००४११११५६**

ग्रंथ हे आपले उत्तम व सच्चे मित्र तर असतातच पण आपले गुरु असतात. ते आपल्याला आपल्या चुकांची जाणीव करून देतात व त्या चुका पुन्हा कधीही होणार नाहीत यासाठी मार्गदर्शन करत असतात. जीवनातील यशस्वी वाटचालीकरिता सातत्याने प्रेरणा देत असतात. उत्तम प्रकारच्या ग्रंथांच्या वाचनाने आपल्याला आपल्या जबाबदाऱ्या व कर्तव्यांची जाणीव होत असते. चांगल्या ग्रंथांच्या नियमित वाचनाने आपणांस कोणत्याही परिस्थितीला वा बिकट प्रसंगाला सामोरे जाण्याची दिव्य शक्ती प्राप्त होते.

विद्वत्वं च नृपत्वं च नैव तुल्यं कदाचन
स्वदेशे पूज्यते राजा विद्वान सर्वत्र पूज्यते

म्हणूनच तर आज आपण आदी वाल्मिकी , विश्वामित्र, शंकराचार्य, गौतम बुद्ध, भगवान महावीर, आर्यभट्ट, वराहमिहीर, नागार्जुन, सुश्रुत, कालिदास, संत ज्ञानेश्वर, संत एकनाथ , संत नामदेव, संत तुकाराम, संत रामदास, संत तुलसीदास, संत कबीर, संत सूरदास आदी संतांचे व महात्मा फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, साने गुरुजी महात्मा गांधी, लोकमान्य टिळक, स्वातंत्र्यवीर सावरकर, स्वामी विवेकानंद, अरविंद घोष, रवींद्रनाथ टागोर, डॉ.अब्दुल कलाम, डॉ.रघुनाथ माशेलकर, डॉ.जयंत नारळीकर, डॉ.प्रकाश आमटे आदी भारतीय विचारवंतांचे तसेच अब्राहम लिंकन, रुसो, प्लेटो, अरस्तू, मार्टिन ल्युथर किंग, विल्यम शेक्सपिअर, विल्यम वर्ड्सवर्थ, रसेल आदी पाश्चात्य विचारवंतांचे साहित्यही आवर्जून वाचले पाहिजे. कारण पुस्तकांमुळे आपण जगाचे विचार घेऊन आपले विचारही जगाच्या कानाकोपऱ्यात पोहचवून योग्य ते परिवर्तन घडवून आणू शकतो.

पुस्तके आपल्यात योग्य तो निर्णय घेण्याची क्षमता विकसित करतात. आपल्या दैनंदिन जीवनात भवताली घडणाऱ्या नानाविध प्रसंग व घडामोडींचे ज्ञान व आकलन वाचनाने होत असते. आपण आपल्या अंगी वाचनाच्या चांगल्या सवयी बाणवल्या तर आपल्याला आपल्या जीवनात कधीही कंटाळा व थकवा येत नाही तसेच आपल्याला कधीही एकाकीपणा वाटत नाही.

चांगल्या पुस्तकांच्या व ग्रंथांच्या संदर्भात वरील सर्व बाबी आपण लक्षात घेता - आपल्याला आजच्या स्पर्धेच्या युगात यशस्वी वाटचाल करायची असेल, आपल्याला इतरांपेक्षा अधिक स्मार्ट व हुशार बनायचे असेल, आपल्यातील ताणतणावांना अपल्यापासून कायमचे दूर करायचे असेल, आपली उन्नती व प्रगती साधून आपल्या देशाचा योग्य दिशेने विकास घडवून आणायचा असेल तर आपल्याला उत्तम पुस्तकांच्या वाचनाशिवाय तरणोपाय नाही!

संत ज्ञानेश्वर माऊली म्हणतात –
"वाचूनिया वाचाल तेव्हाचि शहाणे"

केवळ पुस्तकं वाचून नाही तर वाचलेल्या गोष्टी समजून घेतल्यावरच शहाणपण येते, हेही आपण लक्षात घेतले पाहिजे. इंटरनेटद्वारे फेसबुक, इंस्टाग्राम, युट्यूब आदींमध्ये नको तिथे व नको त्या गोष्टीमध्ये लक्ष केंद्रित करण्यापेक्षा आपण वेळेचा सदुपयोग म्हणून त्याद्वारे आपल्याला आवश्यक त्या गोष्टींचे वाचन केले तर आपल्या जीवनाचे सोने होईल.

शिवाय, आपण सर्वांसह विद्यार्थी व पालकांनी हेही पक्के लक्षात ठेवले पाहिजे की, वाढदिवसाच्या वेळी केक कापून, इतरांना पुष्पगुच्छ देऊन आपला वाढदिवस साजरा करण्यापेक्षा चांगली व उपयुक्त अशी पुस्तके एकमेकांना वाटून वाढदिवस साजरा करावा. आपण लक्षात घ्यावे की, आपल्या कुटुंबात एखादया व्यक्तीचे निधन झाले असल्या नातेवाईक व परिवारातील व्यक्ती यांनी शाळेला किंवा एखाद्या वाचनालयाला ग्रंथ वा पुस्तक दान करावे. आपण आपल्या कुटुंबातील लग्न-सोहळ्यात पुष्पगुच्छ व वस्त्रभेट देण्यापेक्षा एखाद्या शाळेला किंवा एखाद्या वाचनालयाला पुस्तके भेट द्यावीत.

वाचनाचे आपल्या जीवनातील महत्व लक्षात घेऊन शासनाने व उद्योजक, धनवान आणि दानशूर व्यक्तींच्या सहयोगाने व लोक सहभागातून 'गाव तिथे वाचनालय' व 'शाळा तिथे ग्रंथालय', डिजिटल स्वरुपातील विशेष वाचनालय अशा चळवळी उभारून वाचन चळवळ उभारली पाहिजे तसेच प्रोत्साहन दिले पाहिजे. वाचन चळवळीच्या विकासासाठी शासनाने विशेष आर्थिक तरतूद केली पाहिजे. शासनाने व सेवाभावी संस्थांनी, ग्रंथप्रेमींनी जुन्या आणि प्राचीन अशा दुर्मिळ ग्रंथांचे डिजिटल स्वरूपात जतन करण्याची मोहीम विशेषत्वाने राबवून सर्वसामान्य वाचकांना त्याचा लाभ करून दिला पाहिजे. या वाचन चळवळीच्या यशस्वीतेसाठी पालक, विद्यार्थी, शिक्षक यांसह समाजातील सर्व घटकांनी सहकार्य व मदत केली पाहिजे. कदाचित, त्यातून वैचारिक क्रांतीने मनमशाली पेटून इतरांना प्रबोधनाचा वा उन्नतीचा नवा मार्ग सापडू शकेल. म्हणूनच आपण सर्वजण 'वाचाल तर वाचाल' हा मंत्र जपू या! अनेक उत्तमोत्तम पुस्तकांचे वाचन करण्याचा ठाम निर्धार करू या!!

तर मग, यशाची उत्तुंग शिखरे काबीज करण्यासाठी '
चला, वाचू आनंदे...'

# शेकडो बांधकाम कामगारांना गृहउपयोगी वस्तूंचे वाटप

## महाराष्ट्र जनरल मजदूर संघटनेचा स्तुत्य उपक्रम



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

डोंबिवली :.महाराष्ट्र जनरल मजदूर संघटनेच्या पाठपुराव्यामुळे शासकीय योजने अंतर्गत बांधकाम कामगारांना गृहपयोगी वस्तूंचे वाटप करण्यात आले. पहिल्या टप्प्यात सुमारे ३०० कामगारांना आमदार राजेश मोरे आणि निमंत्रित मान्यवरांचा हस्ते याचं वाटप करण्यात आलं. महाराष्ट्र जनरल मजदूर संघटनेचा स्तुत्य उपक्रमामुळे कामगार आनंदित झाले.

पूर्वेकडील स्व. धर्मवीर दिघे सभागृहात पार पडलेल्या महाराष्ट्र जनरल मजदूर संघटनेचा शानदार कार्यक्रमासाठी कल्याण ग्रामीणचे आमदार राजेश मोरे, माजी स्थायी समिती सभापती रमेश म्हात्रे, शिवसेना कल्याण तालुकाप्रमुख महेश पाटील माजी, नगरसेवक संजय पावशे, उद्योजक विकी हिंगे, ताराराणी ब्रिगेड अध्यक्ष मेघा मोरे, सहकार भारती पदाधिकारी शैलेश दुरगुडे, पायल मार्बल मालक सुरेश जैन, समाजसेविका रेखा कांबळे, सेफ्टी असोसिएशन विशाल शेटे, रिपब्लिकन नेते आनंद नवसागरे, सिनेअभिनेत्री अक्षदा दास, डॉ. शोभा पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष लक्ष्मण मिसाळ यांनी सांगितले की, कामगार महामंडळाच्या माध्यमातून महाराष्ट्र जनरल मजदूर संघटनेचे खडतर प्रयत्न आणि पाठपुरावा यामुळे हे शक्य झाले असून या गृहपयोगी वस्तूंचे वाटप करण्यात येत आहे. याशिवाय दरवर्षी कामगारांच्या मुलांना शिष्यवृत्ती मिळवून देण्यासाठी आमचे प्रयत्न यशस्वी होत आहेत. मुख्य म्हणजे कामगारांच्या मुलींच्या विवाहासाठी व महिला कामगाराच्या प्रसूतीकरताही आर्थिक मदत केली जाते. जर काम करताना एखाद्या कामगारांचा मृत्यू झाल्यास त्याच्या कुटुंबियांना शासनाची मदत मिळवून देण्यासाठी संघटना शासनाकडे पाठपुरावा करते. काम करताना अपघात होवू नये यासाठी चार हजार कामगारांना सेफ्टी किटचे वाटप करण्यात आले. तर दोन हजार कामगारांना गृहपयोगी वस्तूंचे वाटप व दोन हजार पेक्षा जास्त कामगारांना शिष्यवृत्ती मिळवून दिली. कामगारांसाठी असणाऱ्या शासन योजनेची माहिती प्रत्येक सदस्याला दिली जाते.

यावेळी आमदार राजेश मोरे म्हणाले संघटना कामगारांच्या हितासाठी काम करीत आहे. या संघटनेला खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांचे मोलाचे सहकार्य मिळत असून कामगारांच्या योग्य प्रश्नासाठी सहकार्य मिळत असते. लक्ष्मण मिसाळ हे कामगारांसाठी सतत झटत असल्याने या संघटनेच्या सदस्यांमध्ये सतत वाढ होत आहे.

कामगारांच्या गृहउपयोगी वस्तूंचे वाटप कार्यक्रमासाठी नामदेव भानुसे , विश्वनाथ रेवगडे, रामचंद्र वाघ, गजानन डांगे, चंद्रकांत गायकवाड, कमलाकर पाटील, केशव मिसाळ, वंदना जाधव, भुजंग कोरके, संजय मस्के, बद्रीनाथ मखरे यांनी मोलाचे सहकार्य मिळाले.

# रेसिपी
## मिश्र डाळींचे सांडगे



साहित्य -

चणाडाळ - 1 वाटी,मटकीची डाळ - अर्धी वाटी, उडीद डाळ - पाव वाटी, लसणाच्या पाकळया - 6 ते 7, लाल तिखट, जिरे, हिंग ,मीठ, हळद, कोथिंबीर

कृती -

सर्वात आधी तिन्ही डाळी स्वच्छ धुवून घ्या आणि पाणी घालून रात्रभर भिजत ठेवा. सकाळी डाळी भिजल्यानंतर त्यातील अतिरिक्त पाणी काढून घ्या आणि पुन्हा एकदा डाळी पाण्याने धुवून घ्या. यानंतर एका भांड्यात तिन्ही डाळी एकत्र मिक्स करा. यात 6 ते 7 लसणाच्या पाकळया, जिरं घालावे.तयार मिश्रण मिक्सरमध्ये बारीक करून घ्यावे. फक्त डाळ जास्तच बारीक होणार नाही याची काळजी घ्यावी.भरड तयार झाल्यानंतर एका डिशमध्ये काढून घ्या. त्यात चवीनुसार मीठ, लाल तिखच, हळद, हिंग घालावे.

संपूर्ण मिश्रण हाताने मिक्स करा.मिश्रण मिक्स झाल्यानंतर एक प्लास्टिक पेपर घ्या. पेपरला तेलाने ग्रीस करा.त्यावर छोटे-छोटे सांडगे पाडून घ्या. वाळवण्यासाठी सांडगे उन्हात ठेवा.किमान दोन ते तीन दिवस सांडगे उन्हात वाळवा.सांडगे संपूर्णपणे सुकल्यानंतर हवाबंद डब्यात ठेवा.

# भारताचा कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी) संघटनेचा मोर्चा

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

वासिंद : भारताचा कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी) या संघटनेच्या वतीने शहापूर तहसिल कार्यालयावर मोर्चा काढून जन सुरक्षा विधेयकाचा तीव्र निषेध करुन हे विधेयक रद्द करण्याची मागणी केली.

महाराष्ट्र जनसुरक्षा विधेयक रद्द करावे या मागणीसाठी आज दि. 22 एप्रिल रोजी भारताचा कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी) या संघटनेच्या वतीने शहापूर तहसिल कार्यालयावर मोर्चा काढून जन सुरक्षा विधेयकाचा तीव्र निषेध करुन हे विधेयक रद्द करण्याची मागणी केली.




सदरचा मोर्चा रखरखत्या उन्हात निघाला होता. बस स्थानकातून सुरू झालेला हा मोर्चा तहसील कार्यालयावर पोहचून यामध्ये सहभागी शेकडो कार्यकर्ते, पदाधिकारी यांनी या विधेयकाला विरोध दर्शवून निषेध करीत रद्द करण्याचे मागणीचे निवेदन नायब तहसीलदार व्ही.आर. चौधरी यांच्याकडे दिले.

### जन सुरक्षा विधेयकाच्या निषेधार्थ मोर्चा

या मोर्चावेळी माकप जिल्हा सचिव मंडळ सदस्य व तालुका सचिव कॉ.कृष्णा भवर, एसएफआय जिल्हा अध्यक्ष कॉ.भास्कर म्हसे, सिटु राज्य कमिटी सदस्य व तालुका अध्यक्ष कॉ.विजय विशे, माकपचे सोनू वाघ, नंदू खांजोडे, रामदास कोदे, अशोक विशे, मनोज काकवा, मनीष फोडसे, आनंद रोज, बंडू खर्डीकर, अनु अंधेर आदी पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी सहभाग घेत मोर्चाला संबोधित केले.

# सेक्स रॅकेट प्रकरणातील आरोपीला अटक

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता


कल्याण : कल्याणमधील बाजारपेठ पोलीस ठाण्यात सेक्स रॅकेट प्रकरणी वॉंटेड असलेल्या आरोपीला ठाणे गुन्हे शाखेने सोमवारी अटक केली आहे. कल्याणमधील बाजारपेठ पोलीस ठाण्यात सेक्स रॅकेट प्रकरणी आरोपी विनोद मौर्या वॉंटेड होता. त्याच्यावर सीआर क्रमांक २३४/२०२५ बीएनएस १४३ (१), (३), ३(५) या कलमांतर्गत गुन्हा दाखल झाला होता. हा आरोपी आंबिवली गावाजवळील



पंडित चाळ इथल्या हनुमान मंदिरानजिक येणार असल्याची गोपनीय माहिती ठाणे गुन्हे शाखेला मिळाली होती. ही माहिती मिळताच ठाणे गुन्हे शाखेने आंबिवली गावाजवळील पंडित चाळ इथल्या हनुमान मंदिरानजिक आधीच सापळा लावला. तिकडे मौर्या येताच गुन्हे शाखेच्या पथकाने त्याला अटक केली. ठाणे गुन्हे शाखेने आरोपी विनोद मौर्या याला कल्याणच्या बाजारपेठ पोलीस ठाण्यातील पोलिसांकडे सुपूर्द केले आहे.

ठाणे शहर पोलीस आयुक्तालयातील वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली पीएसआय स्नेहल शिंदे, महिला एएसआय श्रद्धा कदम, हेड कॉन्स्टेबल के. बी. पाटील, पोलीस कॉन्स्टेबल उदय घाडगे आणि एएचटीसी ठाणे शहर पथकाने ही कारवाई केली आहे.

# संतोष घावट जपत आहे काष्ट शिल्पांचा वारसा



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड : ठाणे जिल्ह्यातील मुरबाड तालुक्यातील मिल्हे या गावचा सुपुत्र तरुण कलाकार संतोष घावट यांने लाकडापासून अनेक मूर्ती घडविल्या असून महाराष्ट्र व महाराष्ट्र बाहेर या सुबक मूर्तींना मागणी चांगली आहे.

संतोष घावट यांचे वडील हे लाकूड फर्निचरचा व्यवसाय करत,,, आपल्या वडीलाकडूनच प्रेरणा घेत इंटिरियर डिझाईन आणि डेकोरेशन हा डिप्लोमा पूर्ण करून आपले बुद्धी कौशल्य काष्ट शिल्प बनवण्या कामी खर्च करायचं असा निर्णय त्यांनी घेतला. सुरुवातीला खूप मेहनत व कालावधी या हस्तकलेला लागत होता परंतु जिद्द न सोडता सतत परिश्रम करत संतोष याने कलेत पारंगत झाला एका आवडीचे रूपांतर व्यवसाय मध्ये झाले. छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, दगडूशेठ हलवाई, गणपती, लालबागचा राजा, कौन बनेगा या काष्ट मूर्ती त्यांनी बनविला असून त्यांच्या कलेची वाहवा देशभरात होत आहे. कोण बनेगा करोडपती या शो मध्ये इतिहास संशोधक योगेंद्र बांगर यांनी आजीबाई शाळेमार्फत महानायक अमिताभ बच्चन यांना संतोष घावट यांनी बनवलेली अमिताभ यांची कास्टमूर्ती भेट दिली होती. व केबीसी सेटवर संतोष घावट यांचे अमिताभ बच्चन यांनी कौतुक केले होते लाकडी सुबक कामामुळे मुरबाडचे नाव लौकीक होत आहे.

*लाकडापासून विविध कलाकृती बनविताना अत्यंत मेहनत घ्यावी लागते,, सतत एकाग्रवृत्तीने ध्येयवादी दृष्टीकोनातून शिल्प साकारते. काष्ट शिल्प हे पारंपरिक ज्ञान असून,, माझ्या वडिलांकडून हा वारसा मला मिळाला आहे याचा मला अभिमान असून यातून अनेकांना रोजगार प्राप्त होत आहे. -संतोष घावट, काष्ट शिल्पकार मिल्हे/मुरबाड*

# महात्मा गांधी विद्यामंदिर शाळेत विद्यार्थ्यांची नेत्र तपासणी

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : विद्यार्थी, पालक, शिक्षक यांच्या डोळ्यांचे आरोग्य चांगले राहण्यासाठी , दृष्टी है तो सृष्टी है! या उक्तीप्रमाणे डोळ्यांचे महत्त्व व त्याचे आरोग्य यासाठी नेत्र तपासणी कॅम्पचे आयोजन डोंबिवली पश्चिमेतील महात्मा गांधी विद्यामंदिर शाळेत मुख्याध्यापक अजयकुमार जोगी यांच्या संकल्पनेतून सोमवारी करण्यात आले होते. डॉ.अगरवाल आय हॉस्पिटल घरडा सर्कल



डोंबिवली (पूर्व) यांच्या तर्फे शिशु बालवर्ग ते इ. चौथी पर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांची व पालकांची मोफत नेत्र तपासणी करण्यात आली. हॉस्पिटलचे प्रतिनिधी दीपक कोल्हे, नुजहा मोमीन व नेहल आवटे यांच्या मार्गदर्शनाखाली नेत्र तपासणी करण्यात आली. त्यावेळी उद्घाटनासाठी प्रमुख पाहुणे म्हणून पत्रकार कुणाल म्हात्रे यांच्या हस्ते या नेत्र तपासणी शिबिराचे उद्घाटन करण्यात आले.

कुणाल म्हात्रे यांनी आपल्या डोळ्यांचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. मोबाईलचा वापर कमी करा डोळ्यांची काळजी घ्या असे आवाहन करताना त्यांनी मराठी शाळेविषयी त्यांचे प्रेम व्यक्त केले. मराठी भाषा व मराठी शाळा वाचवण्यासाठी त्यांनी केलेले प्रयत्न वाखाणण्या सारखे आहेत. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ललिता कुलकर्णी यांनी केले. नेत्र तपासणी शिबिर सोमवार व मंगळवार दोन्ही दिवस भरवण्यात आले. ३०० विद्यार्थी, पालक, शिक्षक यांची नेत्र तपासणी करण्यात आली. ज्या मुलांमध्ये नेत्रदोष आहेत त्या पालकांना पुढील सूचना करण्यात आल्या.

# कल्याणमध्ये कॅरम स्पर्धेचे आयोजन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण मधील सिद्धिविनायक कॅरम हाऊसच्या ३७ वा वर्धापन दिना निमित्त रविवार २७ एप्रिल २०२५ रोजी सकाळी १० वाजता ठाणे जिल्ह्यात पहिल्यांदा एकेरी कॅरम शहर चषक स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेमध्ये ठाणे जिल्हा मर्यादित म्हणजे कल्याण डोंबिवली मुंब्रा ठाणे भिवंडी अंबरनाथ बदलापूर या शहरातील प्रत्येकी पहिल्या आठ स्पर्धकांना प्रवेश देण्यात येईल. कॅरम स्पर्धेचे ठिकाण शिवनेरी मैदान शिवनेरी क्रीडा मंडळ जोशीबाग कल्याण पश्चिम हे असून अधिक माहिती साठी संपर्क ज्ञानेश्वर राहाणे 8691885533



# उल्हास नदीच्या प्रदूषणमुक्तीसाठी केडीएमसी सर्वोतोपरी प्रयत्न करणार

दै. ठाणे जीवनदीप वार्ता
प्रतिनिधी

**कल्याण** – कल्याण डोंबिवली शहरांना पाणी पुरवठा करणारी उल्हास नदी स्वच्छ सुंदर, प्रदूषण मुक्त राहील यादृष्टीने सर्वोतपरी प्रयत्न केले जातील. मोहने, गाळेगाव भागातून उल्हास नदीत जाणारे मलनिस्सारणाचे नाले कायमस्वरुपी बंद करण्यासाठी एक विकास प्रकल्प अहवाल तयार केला जाईल. हा अहवाल येत्या आठवड्यात शासनाकडे अंतीम मंजुरीसाठी पाठविण्यात येऊन मोहने, गाळेगाव येथील उल्हास नदीत जाणारा मलनिस्सारण नाल्याचा विषय कायमचा बंद करण्यात येईल, असे कल्याण डोंबिवली पालिका आयुक्त अभिनव गोयल यांनी सोमवारी माध्यमांना सांगितले.



उल्हास नदी स्वच्छ ठेवणे, या नदीचे पुनरूजीवन करणे यासाठी विविध उपाययोजना केल्या जातील आणि नदी स्वच्छ सुंदर राहील यासाठी प्रशासन प्रयत्न करील. 'चला जाणू या नदीला' असा उपक्रम यापूर्वी शासनाने सुरू केला होता. असे काही उपक्रम हाती घेता येतील का. या उपक्रमात लोकांचा सहभाग वाढविता येईल का याचाही विचार करण्यात येईल,
● अभिनव गोयल , आयुक्त कल्याण डोंबिवली पालिका

पावसाळ्यापूर्वी नालेसफाईच्या कामांची पाहणी, पावसाळ्यातील पाणी तुंबणारे सखल भाग, उल्हास नदीतील जलपर्णी याविषयांची प्रत्यक्ष माहितीसाठी घेण्यासाठी आयुक्त गोयल यांनी अतिरिक्त आयुक्त गोडसे, शहर अभियंता अनिता परदेशी, उपायुक्त प्रसाद बोरकर, अतुल पाटील, संजय जाधव, कार्यकारी अभियंता घनश्याम नवांगुळ यांच्या सोबत मोहने, उल्हास नदी भागाचा पाहणी दौरा केला.

उल्हास नदीमध्ये औद्योगिक कंपन्यांचे पाणी प्रक्रिया न करता थेट सोडले जाते. त्यामुळे नदी जलप्रदुषित होऊन जलपर्णी वाढण्याचे प्रमाण अधिक आहे. हा विषय महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अखत्यारितील आहे. तरीही मोहने, गाळेगाव येथील भागातून उल्हास नदीत जे मलनिस्सारणाचे पाणी थेट नदीत जाते. हा प्रश्न कायमचा सोडविण्यासाठी पालिकेकडून एक विकास प्रकल्प अहवाल तयार केला जाईल. शासनाच्या मंजुरीनंतर हे काम हाती घेऊन मोहने, गाळेगाव भागातील मलनिस्सारण आणि येथील नदी प्रदूषणाचा विषय निकाली काढला जाईल, असे आयुक्त गोयल यांनी सांगितले.

# मैदानांसाठी ठाणे मनपा मुख्यालयासमोर क्रिकेट खेळत भाजपचे अनोखे आंदोलन

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** - शहरात गावदेवी मैदान, घंटाळी मैदान, भगवती मैदान सारखी मोठी मैदान आहेत. परंतू, याठिकाणी ऐन उन्हाळी सुट्टीत भरविण्यात येणाऱ्या व्यावसायिक प्रदर्शनामुळे स्थानिक मुलांना खेळायला मैदान शिल्लक राहिले नसल्याची बाब समोर ही बाब लक्षात घेऊन भाजपाचे माजी नगरसेवक सुनेश जोशी आणि मृणाल पेंडसे यांनी स्थानिक मुलांना घेऊन महापालिकेच्या प्रवेशद्वारावर क्रिकेट खेळत आंदोलन केले.

उन्हाळी सुट्टीचा हा कालावधी असून या सुट्यांमध्ये अनेकांचा कल हा मैदानी खेळ खेळण्याकडे असतो. परंतू, अलिकडे बऱ्याच ठिकाणी मैदानेच शिल्लक राहिली नसल्याचे पाहायला मिळते. त्यामुळे मैदानी खेळ




खेळायचे तरी कुठे असा प्रश्न मुलांसमोर निर्माण होतो. ठाणे शहरात स्थानक परिसर आणि नौपाडा परिसराजवळ गावदेवी, घंटाळी आणि भगवती असे तीन मैदाने आहेत. परंतू, ही मैदाने खेळण्यासाठी उपलब्धच नसल्याची खंत काही मुलांनी व्यक्त केली.

या मैदानांमध्ये वारंवार काहींना काही कार्यक्रम किंवा प्रदर्शन भरविले जात असल्याचे दिसून येते. ही बाब लक्षात घेऊन भाजपाचे माजी नगरसेवक सुनेश जोशी आणि मृणाल पेंडसे यांनी स्थानिक मुलांना घेऊन ठाणे महापालिका मुख्यालयाबाहेर क्रिकेट खेळत आंदोलन केले. ही मैदाने आठ दिवसात स्थानिक मुलांना खेळण्यासाठी मोकळी करुन दिली नाही तर, या मुलांसोबत आयुक्तांच्या दालनात क्रिकेट खेळू असा खोचक इशारा महापालिकेला देण्यात आला आहे.

**ठाणे महापालिकेने २०१९ मध्ये गावदेवी मैदान हे फक्त स्थानिक मुलांना खेळांसाठी उपलब्ध असून या ठिकाणी कोणत्याही प्रकारे व्यावसायिक प्रदर्शन भरवता येणार नाही, अशा प्रकारचा ठराव महासभेत मंजूर केला होता. परंतू, असे असूनही या मैदानात दिवाळी महोत्सव, हिवाळ्यात नाताळ महोत्सव, संक्रांतीला एवढ्या वस्तूंची खरेदी करा आणि पैठणी जिंका, तर अलिकडे भरविण्यात आलेला चैत्र पालवी महोत्सव अशा या महोत्सवांमुळे मैदान १५ दिवस किंवा महिनाभर आडविली जातात. आसा आरोप भाजपनं केलाय**

# चोळे गावातील तरुणाचे न्यायाधीश परीक्षेत यश



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**डोंबिवली** - ठाकुर्लीतील चोळेगाव मधील मूळ रहिवासी असलेले, डोंबिवलीतील पेंडेसनगरमध्ये पाटीलवाडीत वास्तव्यात असलेले सन्मित सुनील पाटील यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे घेण्यात आलेल्या दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर आणि न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग परीक्षेत यश संपादन केले आहे. अशा न्यायालयीन परीक्षेत यश संपादन करणारे डोंबिवली, कल्याण परिसरातील सन्मित पाटील अलीकडच्या काळातील पहिलेच तरूण आहेत.

सन २०२२ मध्ये सन्मित पाटील यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे घेण्यात आलेली दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग स्पर्धा परीक्षा दिली होती. सन्मित पाटील यांच्या या यशाबद्दल त्यांचे ठाकुर्ली चोळेगाव, डोंबिवलीतील विविध स्तरातील नागरिकांकडून कौतुक केले जात आहे. आपल्या मुलाने न्यायाधीश व्हावे, अशी सन्मित यांचे वडील सुनील पाटील यांची इच्छा होती. आता त्यांचे वडील हयात नाहीत. वडिलांच्या शब्दाप्रमाणे सन्मित यांनी वडिलांचा शब्द खरा करून आपल्या जीवनाची वाटचाल सुरू केली आहे. चोळे गावातील तरुणाने न्यायाधीश पदाच्या परीक्षेत यश संपादन केल्याबद्दल चोळे गावचे ग्रामस्थ माजी नगरसेवक प्रभाकर चौधरी, जनादर्न पाटील, मधुकर पाटील, अनंता राणे, लक्ष्मीकांत साळवी, बंटी पाटील यांनी पेंडसेनगर पाटीलवाडी येथे जाऊन सन्मित पाटील यांचे पुष्पगुच्छ देऊन कौतुक केले. सन्मित यांची आई नंदा पाटील यांनीही मुलाच्या यशाबद्दल समाधान व्यक्त केले आहे. सन्मित यांचे मार्गदर्शक अॅड. गणेश शिरसाठ, अॅड. रंजित झुंझारराव, अॅड. सुजाता भोईर-म्हात्रे आणि कुटुंबीयांनी सन्मित पाटील यांचे कौतुक केले आहे.

# वाहोली गावातील शेतकऱ्यांनी टॉवरचे काम केले बंद

**शेतकऱ्यांना टॉवर लाईन भूसंपादन प्रक्रियेसाठी रीतसर नोटीसा देऊन प्रांत कार्यालयात बैठका घेतल्या आहेत.**
**- श्री. लोखंडे ,**
**पारेषण कंपनी अधिकारी**

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**टिटवाळा-:** "शेती आमचं आयुष्य आहे, आणि ती हिरावणाऱ्यांपासून आम्ही हे आयुष्य झगडून वाचवणारच! यासाठी कल्याण तालुक्यातील १२ गावातील शेतकऱ्यांनी पारेषण कंपनीच्या कामाला विरोध दर्शवित त्यांचे काम बंद पाडले आहे. न्यायासाठी शेतकऱ्यांनी उबाठा शिवसेनेकडे धाव घेतली आहे. उबाठाने या संदर्भात आंदोलनाचा इशारा दिला असता कल्याण तालुका पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुरेश कदम यांनी उबाठा शिवसेना पक्षाचे कार्यकर्ते, शेतकरी व पारेषण कंपनीचे अधिकारी यांची समझोता बैठक लावली. मात्र या बैठकीत तोडगा निघाला नसल्याने येत्या गुरुवारी २४ तारखेला १२ गावातील शेतकऱ्यांना घेऊन उबाठा आंदोलन छेडणार असल्याचे उबाठाचे नेते अल्पेश भोईर यांनी सांगितले.

वाहोलीसह १३ गावांमधल्या शेतकऱ्यांच्या शेतजमिनींवर कोणतीही पूर्वसूचना, ना कायदेशीर नोटीस, थेट जेसीबी मशीन घुसली, झाडं उध्वस्त झाली आणि मातीत खोल चर उमटले. मात्र यावेळी शेतकरी शांत बसले नाहीत. त्यांनी कंबर कसली आणि पोलिस ठाण्यात झालेल्या बैठकीत आपलं म्हणणं व्यक्त करत सांगितले की, कंपनीला आमच्या जमीनत पाऊल टाकू देणार नाही, असा ठाम इशारा दिला.

महापारेषण कंपनीकडून कल्याण तालुक्यातून मुरबाडकडे टॉवर लाईन टाकण्याचं काम सुरू आहे. पण या लाईनखाली येणाऱ्या जमिनींवरती शेतकऱ्यांच्या स्वप्नांचं, श्रमांचं, भविष्यातल्या पिढ्यांचं पीक उगमाला येतं. अशा जमिनी



तुडवून जाताना मोबदला तर सोडाच, एक शब्दही न सांगता प्रशासनाने थेट 'कारवाई' सुरू केली. हे कारवाई नाही, ही तर लुट आहे असा थेट आरोप शेतकऱ्यांतून केला जात आहे.

आडवली, चिंचवली, उतणे, रुंदे, म्हसकल, आधार, गोवेली, पिंपळोली, वाहोली,आपटी, वसत, जांभूळ या सगळ्या गावांनी आता सरकारला एकजूटीनं उत्तर दिलंय "जमीन आमची, हक्क आमचा... आणि निर्णयही आमचाच!"

शेतकऱ्यांचं म्हणणं आहे, जेव्हा जमिनीच्या वरून टॉवर जातो, तेव्हा त्या पट्ट्यातली जमीन कायमची शेतीसाठी अयोग्य होते. त्याचं नुकसान भरून न देता जर अशा प्रकारे प्रकल्प रेटले जात असतील, तर हे स्वीकारार्ह नाही. टिटवाळा पोलीस ठाण्यात महापारेषण अधिकारी, पोलीस निरीक्षक, शिवसेना (उद्धव ठाकरे) गटाचे नेते अल्पेश भोईर आणि ग्रामस्थ यांच्यात चर्चा झाली. मात्र कोणताही ठोस तोडगा न निघाल्याने, शेतकऱ्यांनी उघड उघड सांगितलं – "प्रकल्प थांबवा, अन्यथा आम्ही रस्त्यावर उतरू!" शिवसेना ठाकरे गटाच्या वतीने आंदोलन छेडण्यात येणार आहे. "शेतकऱ्यांचा आवाज दडपण्याचा प्रयत्न झाला, तर शिवसेना गप्प बसणार नाही," २४ एप्रिल रोजी मोठ्या संख्येने शेतकरऱ्यांना घेऊन आंदोलन होणार असल्याची घोषणाही त्यांनी यावेळी केली. शेतकऱ्यांनी फक्त मोबदला नाही, तर स्वाभिमानासाठी लढायला सुरुवात केली आहे. हा लढा जमिनीवरचा नाही – हा हक्कांचा लढा आहे. असं वक्तव्य अल्पेश भोईर यांनी केलं.

# शिवाय पब्लिकेशन्स तर्फे २६ एप्रिल रोजी राष्ट्रीय संशोधन ई परिषद

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मीरा रोड :** आगामी राष्ट्रीय संशोधन परिषदेत सहभागी होण्यासाठी संशोधक, शिक्षणतज्ज्ञ आणि व्यावसायिकांसाठी मीरा रोड च्या शिवाय पब्लिकेशन्स तर्फे 26 एप्रिल रोजी राष्ट्रीय संशोधन ई परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे.

या ई परिषदेचे उद्दिष्ट विविध क्षेत्रातील तज्ञांना एकत्र आणून त्यांचे संशोधन निष्कर्ष शेअर करणे, विचारांची देवाणघेवाण करणे आणि भारतातील अलीकडील घडामोडींवर चर्चा करणे हे आहे. कॉन्फरन्सची मुख्य थीम विकसित भारत: 2.0 अशी आहे. 26 एप्रिल 2025 रोजी ऑनलाइन पद्धतीने ही परिषद आयोजित केली जाईल.

सामाजिक विज्ञान, भाषा, आदरातिथ्य अभ्यासापासून वाणिज्य, विज्ञान, गणित, माहिती तंत्रज्ञान, कॉम्प्युटर सायन्स, डेटा सायन्स या विषयांपर्यंत आंतर-विद्याशाखेतील उप-थीम दिलेली आहेत. निवडक शोधनिबंध पीअर रिव्ह्यूड जर्नल, स्कोपस आणि UGC CARE सूचीबद्ध जर्नलमध्ये प्रकाशित केले जातील. या ई कॉन्फरन्समध्ये प्राध्यापक, रिसर्च स्कॉलर, विद्यार्थी आणि उद्योग क्षेत्रातील तज्ज्ञ सहभागी होऊ शकतात.

24 एप्रिल 2025 पर्यंत तुमचा संपूर्ण रिसर्च पेपर सबमिट करावा, असे आवाहन श्री. हार्दिक गोराडीया यांनी केले.

या E परिषदेसाठी मुख्य अतिथी CS प्रिया शाह आणि कॅनडा च्या Accenture चे अभियंता दिनेश कुमार प्रामुख्याने उपस्थित राहणार आहेत.

अधिक माहितीसाठी, आपण Hardik Goradiya 8097665698 आणि श्रीमती Khushboo Bidawadka 9322859159 यांच्याशी संपर्क साधू शकता. संशोधन लेख shivaypublications@gmail.com या email वर पाठवावे.

# महिलेवर अत्याचार करणाऱ्या सरपंच राकेश दाभाडेला अटक



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण (प्रतिनिधी)** पेण तालुक्यातील हमरापूर गावचे सरपंच राकेश दाभाडे यांनी एका महिलेवर पंधरा वर्षे अत्याचार केल्या प्रकरणी असह्य झालेल्या फिर्यादी महिलेने दिलेल्या तक्रारीनुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपीस पेण पोलिसांनी अटक केली आहे.

याबाबत सविस्तर वृत्त असे की हमरापूर गावचे सरपंच राकेश दाभाडे याने सन २०१० मध्ये फिर्यादी महिलेशी प्रेमाचे नाटक करुन तीच्यावर अनेकदा शारीरिक संबंध ठेवले यामध्ये फिर्यादी खालच्या जातीची म्हणजेच बुरूड समाजाची असल्याने लग्नास नकार देवून फिर्यादी हिचे स्वतःचे मोबाईलमध्ये काढलेले अश्लिल फोटो याचा फायदा घेत फिर्यादीस भेटण्यास बोलावून तीने नकार दिल्यास ते फोटो व्हायरल करण्याची धमकी देत तीच्यावर झी गार्डन हॉटेल, कोंबडपाडा, रामवाडी युनायटेड बिल्डींग येथे बोलावून १२/०४/२०२५ पर्यंत जबरदस्तीने शारिरीक संबंध प्रस्थापित केले असल्याने याबाबत फिर्यादीने आरोपी याची पत्नी अक्षता दाभाडे हिस याबाबतची सर्व हकिगत सांगण्याकरीता १६/०४/२०२५ रोजी हमरापूर येथे गेली असता आरोपी सरपंच यांच्या पत्नीने फिर्यादीला तू खालच्या जातीची आहेस तुला काय करायचे आहे ते कर असे बोलल्यानंतर फिर्यादी हिने राकेश दाभाडे यांच्या पत्नीला शांतपणे बोलण्याबाबत सांगितले

तेव्हा सरपंच म्हणाला की माझ्या पत्नीशी नीट बोल व तू जे करणार आहे ते कर तुम्ही सर्व खालच्या जातीचे आहात असे जातीवाचक बोलून तीला अपमानीत केले.त्यामुळे फिर्यादीने पेण पोलिस ठाण्यात भा.न्या.स.कलम ६४,६४(२),(एम),३५१(२),३(५), अनुसूचित जाती जमाती अत्याचार प्रतिबंध अधिनियम १९८९ चे कलम (३)(आर),३(१) (एस) ३ (१) (डब्ल्यू) (i) (ii) नुसार अॅट्रॉसिटी अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.याबाबत पुढील तपास पोलिस उपविभागीय अधिकारी गजानन टोम्पे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक संदीप बागुल यांच्या माध्यमातून पोलिस करत आहेत.

# मुंबई-अहमदाबाद महामार्गावरील सगनाई देवीचे मंदिर स्थलांतरित

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भाईंदर : मुंबई-अहमदाबाद महामार्गावरील रस्त्यालगत असलेले आई सगनाई देवीचे मंदिर स्थलांतरित करण्यास अखेर महापालिकेने सुरुवात केली आहे. यावेळी कोणत्याही प्रकारचा अनुचित प्रकार घडू नये यासाठी कडेकोट पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.**

भाईंदर घोडबंदर रस्त्यावर आई सगनाई देवीचे जुने मंदिर आहे. हे मंदिर मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गाच्या रस्ता रुंदीकरणात बाधित होत आहे. सध्या याच ठिकाणी रस्त्याच्या कामास सुरुवात करण्यात आली असून वाहतूक कोंडीची समस्या जाणवत आहे. त्यामुळे हे मंदिर नवीन जागेत स्थलांतर करून महामार्गाचे रुंदीकरण करण्याबाबत भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने (एनएचएआय) मिरा-भाईंदर महापालिकेकडे पत्रव्यवहार केला आहे. त्यानुसार मंदिर याच



"रस्त्याचे रुंदीकरण व इतर विकासकामे पूर्ण करण्यासाठी हे मंदिर जवळच स्थलांतरित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार ग्रामस्थ आणि पोलीस प्रशासनाच्या मदतीने स्थलांतराचे काम हाती घेण्यात आले आहे. यावेळी कोणताही वाद झालेला नसून प्रशासनाकडून पूर्ण खबरदारी घेण्यात आलेली आहे."
संभाजी पानपट्टे - अतिरिक्त आयुक्त ,
मीरा भाईंदर महानगरपालिका

समोरील नवीन जागेत स्थलांतरीत करण्याचा प्रस्ताव पालिकेने ग्रामस्थांपुढे ठेवला आहे. यापूर्वी महापालिकेने उभारलेल्या जागेत मंदिर स्थलांतरित करण्यास ग्रामस्थांच्या विरोध असल्याने हे काम रखडले होते. मात्र आता वाढत्या वाहतूक कोंडीच्यासमस्यांचा विचार करता मंदिर त्वरित स्थलांतरीत करण्याचा ठाम निर्णय प्रशासनाकडून घेण्यात आला होता. याबाबत नुकतीच मंदिर समिती व ग्रामस्थांसोबत आयुक्त राधा विनोद शर्मा यांनी बैठक घेतली होती. यामध्ये अखेर ग्रामस्थांनी संमती दिल्यामुळे मंगळवारी सकाळीच मंदिर स्थलांतरीत करण्याचे काम प्रशासनाने हाती घेतले. यावेळी कोणताही वाद किंवा गैरप्रकार होऊ नये म्हणून पोलीस आयुक्तालयाच्या परिमंडळ १ तर्फे मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. तर पुढील एक ते दोन दिवसात मंदिर स्थलांतरित करून मूर्तीची प्रतिष्ठापना करणार असल्याची माहिती ग्रामस्थांकडून देण्यात आली आहे.

मुंबई अहमदाबाद महामार्गावरील सगनाई देवीचे मंदिर स्थलांतरित करण्यावरून बऱ्याच वर्षापासून वाद सुरु आहे. हे प्रकरण न्यायालयात गेल्यामुळे पालिका प्रशासनाने मंदिर व्यतिरिक्त इतर सर्व परिसर मोकळा करून रस्त्याचे रुंदीकरण करून घेतले होते. मात्र आता उड्डाण पूल, भुयारी मार्ग व इतर वाहनाच्या रहदारी मार्गावर हे मंदिर अडचण ठरू लागल्यामुळे ठाम भूमिका घेऊन मंदिराच्या स्थलांतराचा निर्णय घेतला. विशेषतः संबंधित ग्रामस्थांना विश्वासात घेऊन हे काम सुरू केल्याने प्रश्न मिटला आहे.

# नवी मुंबईतील उद्यानांमध्ये सेंद्रिय खत निर्मिती केंद्रे

दै. ठाणे जीवनदीप वार्ता
प्रतिनिधी

**नवी मुंबई :** उद्यानांमधील ओल्या कचऱ्याचे सेंद्रिय खतात शास्त्रोक्त पद्धतीने रूपांतरण केले जात असल्याने नवी मुंबईतील उद्यान अधिक हिरवेगार आणि समृद्ध झाली आहेत. या प्रक्रियेतून तयार होणारे सेंद्रिय खत उद्यानांमधील वनस्पती, झाडे-झुडपे आणि हिरवळीसाठी वरदान ठरत आहे. यामुळे रासायनिक खतांवरील अवलंबित्व कमी होऊन, नैसर्गिक खत वापरास प्रोत्साहन मिळत असल्याची माहिती नवी मुंबई महापालिकेने दिली.

नवी मुंबई शहर हे उद्यानांचे शहर म्हणूनही ओळखले जात आहे. विविध उद्यानांमध्ये एकूण १२० सेंद्रिय खत निर्मिती केंद्रे निर्माण करण्यात आलेली आहेत. याठिकाणी पालापाचोळा, हिरवा कचरा आणि इतर सेंद्रिय कचऱ्याचे शास्त्रोक्त पद्धतीने विघटन केले जाते. नैसर्गिक सेंद्रिय खत बनवण्याची प्रक्रिया अतिशय सोपी असून त्याकरिता विटा रचून चौरस किंवा आयताकृती आकाराचे लहान आकाराचे केंद्रे बनविण्यात येत आहे. यामध्ये मातीचा थर टाकला जातो.. त्यानंतर त्यात कल्चर (जीवाणूयुक्त खत) टाकण्यात येते.

दररोज निर्माण होणारा हिरवा कचरा केंद्राध्ये टाकून ओले शेण मिश्रित पाणी शिंपडून त्याला नियमितपणे काटेरी उपकरणाने ढवळले जाते. साधारणतः ४५ दिवसांत चांगल्या प्रतीचे सेंद्रिय खत झाडांसाठी तयार होते. हे तयार झालेले खत झाडांना, हिरवळीसाठी, झाडे-झुडपे, गच्चीवरील कुंड्या व भाजीपाला उत्पादनासाठी वापरले जात असल्याचे पालिकेने स्पष्ट केले.




# अंमली पदार्थ विरोधात कोळशेवाडी पोलिसांची कारवाई

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : पोलीस उपायुक्त परिमंडळ ३, कल्याण यांच्या आदेशानुसार कोळसेवाडी पोलिसांनी मोठी कारवाई करत बेकायदेशीर अमली पदार्थाची तस्करी करणाऱ्या दोघांना अटक केली आहे. अटक करण्यात आलेल्या आरोपींकडून कोडेन फॉस्फेट सिरप व अल्पझोलाम गोळ्याचा साठा हस्तगत करण्यात आला असून, या कारवाईमुळे स्थानिक गुन्हेगारी नियंत्रणात येण्यास मदत होणार आहे. कोळसेवाडी पोलीस पथक मॉल परिसरात २२ एप्रिल रोजी २.३० वा. दरम्यान गस्त घालत असताना, मेट्रो मॉल समोर सार्वजनिक रस्त्यावर रिक्षा स्टॅन्ड जवळ उभी असलेल्या रिक्षात दोन संशयित व्यक्ती आढळून आल्या. या मध्ये मोहम्मद रफीक अब्दुल सलाम वय ४६ वर्ष व अब्दुल सादिक अब्दुल कलाम शेख वय ४८ वर्ष दोघेही राहणार कुरेशी नगर, कुर्ला हे बसलेले होते. त्यांच्या हालचाली संशयास्पद वाटल्याने पोलिसांनी पंचासमक्ष तपासणी केली असता, त्यांच्या ताब्यातील सॅगबॅगमधून कोडेन फॉस्फेट सिरप, अल्प्राझोलाम ५ मी. ग्रॅ. व अल्प्रतन गोळ्या असा एकूण २७ हजार ८० रुपये किंमतीचा अमली पदार्थ हस्तगत करण्यात आला. या प्रकरणी कोळसेवाडी पोलीस ठाण्यात एन. डी. पी. एस. ॲक्ट १८८५ अंतर्गत कलम ८(क) ,२२ (ब) ,२९ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून, आरोपींना अटक करण्यात आले आहे. ही विशेष कारवाई पोलीस उप आयुक्त अतुल झेंडे यांच्या मार्गदर्शनाखाली, सहाय्यक पोलीस आयुक्त कल्याणजी घेटे, कोळसेवाडी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक, गणेश न्ह्यायदे, निरीक्षक संभाजी नाईक, अनिल गायकवाड, जितेंद्र ठोके तसेच पोलीस पोलीस शी. अमित शिंदे, खुशाल नेरकर ,राहुल शिंदे यांच्या पथकाने सदर कारवाई केली असून , या उत्कृष्ट कामगिरीचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.


# ठाणे ग्रामीण राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीच्या पदाधिकाऱ्यानीं घेतली अजितदादांची भेट

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता /पडघा : ठाणे ग्रामीण राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीच्या पदाधिकाऱ्यानीं राष्ट्रवादी कॉंग्रेसचे अध्यक्ष व राज्यचेउ उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांची भेट घेऊन विविध विषयासंदर्भात चर्चा केली.

मंत्रालय मुंबई समोरील राष्ट्रवादी भवनात सोमवारी ही भेट घेण्यात आली यावेळी ग्रामीणमधील सार्वजनिक आरोग्य, रस्ते, पाणी, व राष्ट्रवादी कॉंग्रेस सदस्य नोंदणीबाबत चर्चा करण्यात आली यावेळी गरजुंना मदत करण्यासाठी नेहमी पुढे येत जा व राष्ट्रवादी कॉंग्रेस सदस्य नोंदणी जोमाने करा घाबरू नका मी कायम तुमच्या सोबत आहे.असे अजितदादा पवार यांनी यावेळी ठाणे ग्रामीण मधील पदाधिकांऱ्याना मार्गदर्शन करताना सांगितले.तर राष्ट्रवादी युवक कॉंग्रेस पार्टी भिवंडी तालुका अध्यक्ष दिलशाद शेख यांच्या वतीने अजितदादा पवार यांना फोटोफ्रेम भेट



देण्यात आली. यावेळी राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष प्रमोद हिंदुराव ठाणे जिल्हा अध्यक्ष भरत भाऊ गोंधळे, ठाणे जिल्हा महिला अध्यक्षा कल्पना तारमळे, राष्ट्रवादी युवक जिल्हा अध्यक्ष प्रतीक हिंदुराव भिवंडी तालुका अध्यक्ष विजय दादा पाटील,राष्ट्रवादी युवक कॉंग्रेस पार्टी भिवंडी तालुका अध्यक्ष दिलशाद शेख शहापूर शहर युवा कार्यकर्ते केतन वेखंडे उपस्थित होते.




# माळवाडीतील आदिवासी बांधव आक्रमक

## पाणी, रस्त्याच्या समस्येसाठी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : पेण तालुक्यातील माळवाडी आदिवासी वाडीच्या जल जीवन मिशन योजनेस तीन वर्षे होऊनही काम पूर्ण न केल्याने पाणीटंचाईला सामोरे जाणाऱ्या संतप्त आदिवासी बांधवांनी थेट पेण येथील ग्रामीण पाणी पुरवठा विभागाच्या कार्यालयात सोमवारी २१ एप्रिलला ठिय्या मांडून जबाबदार असलेल्या ठेकेदार व ग्रामीण अभियंत्यांवर तात्काळ कारवाई करण्याची मागणी केली एवढेच नाही तर पुढील सात दिवसात माळवाडीच्या पाणी व रस्त्याच्या समस्येवर तोडगा न निघाल्यास जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्यात येईल असा इशारा ग्राम संवर्धन सामाजिक संस्थेचे अध्यक्ष सामाजिक कार्यकर्ते संतोष ठाकूर यांनी दिला आहे.

एकीकडे भारत देश महासत्ता झाल्याच्या वल्गना करीत डिजि लायझेशनच्या मोठमोठ्या घोषणा करणारी सरकारी यंत्रणा स्वातंत्र्याच्या ७७ वर्षानंतरही आदिवासीना रस्ते, पाण्यासारख्या मूलभूत सुविधा देऊ शकली नसल्याचे वास्तव वारंवार समोर येत आहे. पेण तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत आंबिवली हद्दीतील माळवाडी आदिवासी वाडीच्या निमित्ताने हे वास्तव पुन्हा एकदा समोर आले आहे. येथील आदिवासी वाडीला आजपर्यंत शुद्ध पाण्याच्या व्यवस्थेसह रस्ता देखील नाही. सदर वाडीला पिण्याच्या पाण्याची व्यवस्था नसल्याने दोन वर्षांपूर्वी शितोळेवाडी आणि माळवाडी या दोन आदिवासी वाड्यांसाठी जल जीवन मिशन मधून सुमारे ४६ लाख रुपयांची योजना मंजूर करण्यात आली. याचा ठेका सतीश सुधाकर घरत या ठेकेदाराला देण्यात आले. या योजनेचे काम डिसेंबर २०२४ मध्ये पूर्ण होणे अपेक्षित असताना आजही अर्धवट आहे. विशेष म्हणजे सदर योजनेचे काम सुरू असताना ठेकेदार किंवा ग्रामसेवक एकदाही वाडीत फिरकले नसल्याचे संतप्त आदिवासी भगिनींनी सांगितले असून पाणीपुरवठा विभागाच्या अभियंत्यांमुळेच आजपर्यंत ५० टक्केही काम पूर्ण झालेले नाही. मालवाडीत बांधण्यात येत असलेल्या जलसंचय टाकीचे कामही अर्धवट सोडले आहे. याबाबत पाणीपुरवठा विभागाचे अभियंता रमेश राठोड यांना वारंवार सांगून देखील कोणतीही उपाययोजना न केल्यामुळेच आमच्यावर पाणीटंचाईचे संकट ओढावल्याने हंडावर पाण्यासाठी दोन किलोमीटर पायपीट करून शितोळेवाडी येथील तलावातील दूषित पाणी प्यावे लागत आहे यास सर्वस्वी ग्रामीण पाणी पुरवठा विभागाचे अभियंता रमेश राठोड आणि संबंधित ठेकेदार जबाबदार असल्याने या दोघांचीही चौकशी करून कारवाई करावी व तात्काळ योजनेचे काम पूर्ण करावे यासाठी संतप्त आदिवासींनी ग्राम संवर्धन सामाजिक संस्थेचे अध्यक्ष संतोष ठाकूर यांच्या नेतृत्वात ग्रामीण पाणी पुरवठा विभागाच्या कार्यालयात जाऊन ठिय्या मांडला त्यानंतर अभियंता रमेश राठोड यांनी उद्या प्रत्यक्ष पाहणी करून तात्काळ पाणीपुरवठा करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करणार असल्याचे सांगतले मात्र हे आदिवासी एवढे संतप्त होते की त्यानंतर लागलीच पेण पंचायत समितीचे गटविकास अधिकारी अविनाश घरत व तहसीलदार तानाजी शेजाळ यांची प्रत्यक्ष भेट घेऊन लेखी निवेदन दिले यावेळी सामाजिक कार्यकर्ते संतोष ठाकूर यांनी पुढील सात दिवसात रस्ता आणि पाण्याच्या समस्येवर तोडगा न निघाल्यास तीव्र आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे.

# महिलांच्या सुरक्षेसाठी तक्रार समिती नसलेल्या कार्यालयांना होणार दंड

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : कामाच्या ठिकाणी महिलांचे लैंगिक छळापासून (संरक्षण प्रतिबंध मनाई व निवारण)अधिनियम कायदा-2013 च्या कलम 26 नुसार शासकीय किंवा खासगी कार्यालये अंतर्गत तक्रार समिती' स्थापन करणार नाहीत अशा कार्यालयांना रुपये 50 हजार दंड आकारण्याची तरतूद आहे. अशी समिती न करणे आणि कायद्यातील व नियमातील तरतुदीचे आणि जबाबदारीचे पालन न केल्यास परवाना रद्द करण्यात येऊन दुप्पट दंड आकारण्यात येईल, अशी माहिती मुंबई उपनगर जिल्ह्याचे जिल्हा महिला व बालविकास अधिकारी संजय धनगर यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली आहे.

कामाच्या ठिकाणी महिलांचे लैंगिक छळापासून (संरक्षण प्रतिबंध मनाई व निवारण) अधिनियम कायदा-2013 च्या कलम चार नुसार शासकीय किंवा खासगी आस्थापनात दहा किंवा दहा पेक्षा



जास्त अधिकारी/ कर्मचारी कार्यरत असल्यास अशा कार्यालयामध्ये महिलांचे लैंगिक छळ होऊ नये म्हणून 'अंतर्गत तक्रार समिती' स्थापन करणे अनिवार्य आहे.

मुंबई उपनगर जिल्ह्यातील सर्व शासकीय व खासगी आस्थापनांमधील उदा. दुकाने, शैक्षणिक संस्था, क्रीडा संस्था, चित्रपट संस्था, शासकीय कार्यालये यांनी ही समिती स्थापन करून त्याचा अहवाल जिल्हाधिकारी कार्यालय, बांद्रा (मुंबई उपनगर) किंवा जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, प्रशासकीय इमारत, पहिला मजला, दुसरा टप्पा, आर. सी. मार्ग, चेंबूर येथे सादर करावा, असेही पत्रकात स्पष्ट करण्यात आले आहे.

# महाराष्ट्र दिनाचा पूर्व तयारी आढावा

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

नवी मुंबई : 1 मे, महाराष्ट्र स्थापना दिनाच्या अनुषंगाने पूर्व तयारीची बैठक अपर आयुक्त (सामान्य प्रशासन) राजलक्ष्मी शहा यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. कोकण भवनातील पहिला मजला समिती सभागृह येथे झालेल्या या बैठकीत कोकण विभागातील विविध कार्यालयातील अधिकारी/ कर्मचारी उपस्थित होते.

महाराष्ट्र स्थापना दिनानिमित्त विभागीय स्तरावरील मुख्य शासकीय ध्वजारोहण दि. 1 मे, 2025 रोजी सकाळी 8.00 वाजता कळंबोली सेक्टर-17 येथील पोलीस मुख्यालयाच्या मैदानावर होणार असून. त्या अनुषंगाने बैठकीत मार्गदर्शन करताना श्रीमती शहा यांनी कोकण भवनातील सर्व शासकीय यंत्रणांनी हा सोहळा शासनाने दिलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करुन यशस्वीरित्या साजरा करण्याबाबत सूचना दिल्या. प्रत्येक विभागाने आपली जबाबदारी व्यवस्थित पार पाडावी आणि हा कार्यक्रम उत्साहात साजरा करावा, असे सांगून सर्वांनी शासकीय पोशाखात कार्यक्रमास उपस्थित राहावे. असे ही त्यांनी यावेळी सांगितले.

# दीन दयाल उपाध्याय ग्रामीण कौशल्य योजनेच्या अंमलबजावणीत महाराष्ट्र आघाडीवर

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

रायगड : ग्रामीण रोजगार व कौशल्य विकासास चालना देण्यासाठी भारत सरकारच्या ग्रामीण विकास मंत्रालयाने दीन दयाल उपाध्याय ग्रामीण कौशल्य योजनेचे (DDU-GKY) सुधारित रूप डीडीयू-जीकेवाय 2.0 सुरू केले आहे. या योजनेच्या अंमल बजावणीत महाराष्ट्र राज्य आघाडीवर आहे.

ग्रामीण विकास मंत्रालयाच्या वतीने नुकताच या योजनेच्या अंमलबजावणीचा आढावा घेण्यासाठी मंत्रालयाचे वरिष्ठ अधिकारी श्री. अबू ओ. सैफी यांनी महाराष्ट्र राज्याचा तीन दिवसांचा दौरा केला. त्यांच्या या दौऱ्यात राज्यातील विविध प्रशिक्षण केंद्रांना भेटी देऊन, योजना प्रभावीपणे राबवण्यासाठी मार्गदर्शन केले.




श्री. सैफी यांनी पुणे जिल्ह्यातील तळेगाव येथील RUDSET प्रशिक्षण केंद्राची पाहणी केली. प्रशिक्षणार्थी आणि प्रकल्प अंमलबजावणी संस्थांच्या प्रतिनिधींशी संवाद साधत त्यांनी योजनांच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीची माहिती घेतली. प्रशिक्षण केंद्राच्या कामगिरीचे कौतुक करत त्यांनी ग्रामीण युवकांसाठी शाश्वत रोजगाराच्या संधी निर्माण करण्याचे महत्व अधोरेखित केले. तथापि, एका केंद्रावर SOPs च्या पालनात त्रुटी आढळून आल्याने श्री. सैफी यांनी तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश दिले.

नवी मुंबईतील राज्य व्यवस्थापन कक्ष-खारघर येथे मुख्य परिचालन अधिकारी श तुषार माळी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या आढावा बैठकीत सध्याच्या योजनांची प्रगती, अडचणी आणि सुधारित योजनेच्या अंमलबजावणीच्या दिशानिर्देशांवर चर्चा झाली. श्री. सैफी यांनी महाराष्ट्रातील तयारीबाबत समाधान व्यक्त करत राज्याला डीडीयू-जीकेवाय 2.0 च्या प्रभावी अंमलबजावणीमध्ये महाराष्ट्र आघाडीचे राज्य असल्याचे सांगितले. डीडीयू-जीकेवाय 2.0 अंतर्गत उद्योग क्षेत्राशी अधिक सखोल जोडणी, डिजिटल ट्रॅकिंग प्रणाली आणि परिणामकेंद्रित अंमलबजावणी यावर भर दिला जाणार आहे. ही योजना ग्रामीण युवकांना कौशल्याधारित रोजगाराच्या संधी देत, देशाच्या ग्रामीण कार्यबलाला गतिशील रोजगार बाजाराशी संलग्न करण्याचे महत्त्वाचे कार्य करत आहे. "ही भेट केवळ आढावा नसून, संस्थात्मक यंत्रणा बळकट करण्याचा आणि मॉनिटरींग प्रक्रियेत पारदर्शकता आणण्याचा एक ठोस प्रयत्न आहे," असे श्री. सैफी यांनी नमूद केले.

ग्रामीण विकास मंत्रालयाच्या वतीने महाराष्ट्राला मिळणाऱ्या पाठिंब्याची खात्री देत, श्री. सैफी यांनी शाश्वत आणि समावेशक विकासाच्या उद्दिष्टांच्या अंमलबजावणीत महाराष्ट्र टीम सक्षम आहे असे विश्वासपूर्वक सांगितले.

## आ.राजेश मोरे यांच्या उपस्थितीत

# पंचायत समितीत त्या गावाच्या पाणी प्रश्नी बैठक



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

डोंबिवली : डोंबिवली जवळील पालिका अंतर्गत १४ गावांना भेडसावणारी पाणी टंचाई, थकीत पाणी बिले याबाबत मंगळवारी आमदार राजेश मोरे यांनी पंचायत समितीचे गट विकास अधिकारी संजय भोये, उप अभियंता प्रणिता कापरकर प्रशासक आणि ग्रामसेवक यांच्या समवेत ग्रामस्थ समिती सदस्याची बैठक घेतली. कल्याण पंचायत समितीच्या कार्यालयात झालेल्या या बैठकीत पाणी प्रश्न सोडविण्याबाबत कोणत्या उपाययोजना करता येतील. तसेच थकीत बिल भरणा आणि पाणी योजना हस्तांतरित याबाबत सविस्तर चर्चा करत सुरु असलेल्या योजनाची कामेयुद्ध पातळीवर पूर्ण करण्याचे निर्देश आमदार राजेश मोरे यांनी अधिकार्यांना दिले.

यावेळी पाणी बिलाची थकबाकी वसुलीबाबत बोलताना त्यांनी या पाणी बिलावर आकारण्यात आलेल्या व्याजावर तोडगा काढण्यासाठी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि कल्याण लोकसभा खासदार डॉ श्रीकांत शिंदे यांच्याशी चर्चा करून सकारात्मक तोडगा काढण्याचे आश्वासन ग्राम कमिटीला देण्यात आले. यावेळी १४ गाव समितीचे अध्यक्ष आणि शिवसेना उपजिल्हाप्रमुख भरत भोईर, सचिव भाजपा नेते लक्ष्मण पाटील, सदस्य तसेच भंडार्ली चे माजी सरपंच धनाजी पाटील, शिवसेनेचे पदाधिकारी डोंबिवली शहर सचिव तथा विद्यानसभा क्षेत्रप्रमुख संतोष चव्हाण, विभागप्रमुख आणि बाजार समिती सभापती भरत भोईर, उपतालुकाप्रमुख गणेश जेपाल आदी सर्व उपस्थित होते. कल्याण ग्रामीण मतदार संघात समाविष्ट असलेल्या १४ गावांना तीव्र पाणी टंचाई भेडसावत असून हि टंचाई सोडविण्यासाठी शासनाच्या माध्यमातून विविध योजनांची कामे सुरु आहेत. या कामाचा आढावा घेतानाच आता तातडीने या नागरिकांना पाणी प्रश्नी कसा दिलासा देता येईल याबाबत आमदार मोरे यांनी गट विकास अधिकारी आणि ग्रामपंचायतीचे ग्रामसेवक प्रशासक यांच्याशी चर्चा केली. यावेळी योजनांची माहिती देताना अधिकाऱ्यांनी थकलेल्या पाणी बिलाबाबत देखील माहिती दिली. दरम्यान पाणी योजना ग्राम कमिटीकडून ग्रामपंचायतीकडे हस्तातरीत केल्या जाणार असून यापुढील वसुलीची जबाबदारी ग्रामपंचायतीकडे राहील मात्र पूर्वीच्या वसुलीसाठी नागरिकांना व्याज माफी देण्याबाबत सकारात्मक चर्चा करण्याचे आश्वासन आमदार मोरे यांनी ग्राम कमिटीला दिले आहे.

# पोप फ्रान्सिस यांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह मान्यवरांकडून श्रद्धांजली

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, कौशल्य विकास, रोजगार, उद्योजकता आणि नावीन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा, मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड, आदिवासी विकास मंत्री अशोक ऊईके, खासदार प्रफुल्ल पटेल यांच्यासह अन्य मान्यवरांनी पोप फ्रान्सिस यांना श्रद्धांजली वाहिली.बॉम्बे स्टॉक एक्सचेंजसमोर उभारण्यात आलेल्या स्व. जवाहरलाल दर्डा यांच्या अर्धाकृती पुतळा अनावरण कार्यक्रम पोप फ्रान्सिस यांच्या दुःखद निधनामुळे रद्द करण्यात आला. या कार्यक्रमास उपस्थित असलेल्या मान्यवरांकडून पोप फ्रान्सिस यांना श्रद्धांजली वाहण्यात आली.

# बीबीसी चॅनेल वर पारगावची महिला सभा झळकणार

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड : मुरबाड तालुक्यातील ग्रामपंचायत किसळ-पारगावच्या सरपंच डॉ. कविता वरे-भालके निवडून आल्यापासून महिला सक्षमीकरण व महिला नेतृत्त्व विकास यावर काम करत आहेत, याच कामाची पोच पावती म्हणुन राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रतिनिधित्व करण्याची संधी प्राप्त झाली. प्रसार माध्यमांनी सुद्धा याबाबत वृत्तांत केले. मिठी बाई महाविद्यालय, एसएनडीटी(SNDT) महिला विद्यापीठ, रुईया महाविद्यालय मधील विद्यार्थी यांनी सुद्धा महिला




सभा अभ्यासण्यासाठी ग्रामपंचायत भेट केली. महिला सभा व मासिका महोत्सव असा अनोखा उपक्रम राबविण्यात आल्याने ग्रामपंचायत किसळ-पारगावची मान उंचावली आहे, याचीच परिणीती म्हणुन बीबीसी या आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या न्यूझ चॅनेलला ग्रामपंचायत किसळ-पारगावच्या महिला सभेला चित्रित करायचे आहे, आतापर्यंत महिला सभेच्या माध्यमातून विविध निर्णय घेऊन त्यावर अंमलबजावणी केली, प्रामुख्याने बस सेवा सुरू करण्याची मागणी महिला सभेने केली व त्यानुसार ती सुरू झाली आज मोठ्या प्रमाणात महिला वर्ग या सेवेचा लाभ उचलत आहे, या चॅनेलला याबाबत महिलांचा अनुभव जाणून घ्यायचा आहे. त्यामुळे ग्रामपंचायत किसळ-पारगाव आंतरराष्ट्रीय स्तरावर झळकणार आहे व महिला शक्तीचे सामर्थ्य दिसणार आहे. ही महिला सभा २७ एप्रिल २०२५ रोजी सकाळी ११ वाजता ग्रामपंचायत कार्यालयात होणार आहे.

# पुरुष आणि महिलांसाठी कुस्ती स्पर्धेचे आयोजन



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

डोंबिवली : गावदेवी मंदिर संस्थान व ग्रामस्थ मंडळ.मोठगाव ठाकुर्ली यांच्या माध्यमातून लोटू आई पालखी महोत्सव व जत्रा उत्सव मोठ्या धुमधाक्यात साजरा करण्यात आला. पारंपारिक पद्धतीने दोन दिवस धार्मिक कार्यक्रम संपन्न झाला. या निमित्त मोठगाव ठाकुर्ली येथील महानगरपालिकेच्या लोकमान्य टिळक शाळेच्या मैदानात जंगी कुस्तीचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत महाराष्ट्रातील नामांकित कुस्तीगीरांनी भाग घेतला. स्पर्धेतील विजेत्यांना ट्रॉफी, रोख पारितोषिके देऊन गौरविण्यात आले. यावेळी माजी महापौर पुडलिंक म्हात्रे, शिवसेनेचे माजी नगरसेवक दीपेश म्हात्रे, आमदार राजेश मोरे, माजी नगरसेवक जयेश म्हात्रे, संतोष केणे, एकनाथ म्हात्रे यांच्यासह अनेक अधिकारी व ग्रामस्थ उपस्थित होते.

दरम्यान स्थानिक ग्रामस्थ तथा शिवसेना ठाकरे गटाचे जिल्हाप्रमुख दीपेश म्हात्रे म्हणाले की, ग्रामीण भागातील मातीचा हा खेळ शहरी भागातही खेळला जात आहे ही खूप आनंदाची गोष्ट आहे. सरकारने कुस्तीपटूंबद्दल अधिक विचार करण्याची गरज आहे. कुस्ती हा मातीचा खेळ आहे. शहरात दरवर्षी कुस्ती स्पर्धा होतात. पण या प्रकारचे सामने प्रत्येक शहरात झाले तर खेळाडूंचे मनोबल वाढेल.




'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री.रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले.
(या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही) (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८, ९०८२६६४७८१ E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024